## प्रकरण चौथे

" युगप्रवर्तक " आणि " रमाई " या कादंब-यातील
आशयसाम्य आणि वाङ्मयीन
विशेष

रमाई व युगप्रवर्तक या कादंब-यांचा अभ्यास करीत असताना. दोन्ही कादंब-यात जे आशयसाम्य दिसते त्याचा आढावा या प्रकरणात घेतलेला आहे.

रमाई या कादंबरीत यशवंत मनोहर यांनी रमाईचे केलेले वर्णन अतिशय भावगर्भ व काव्यमय झालेले आहे.

रमाईचा जन्म एका गरिब कुटूंबात झाला होता. दाभोळजवळ एक लहानस वणंदगाव नावाचं गाव आहे. त्या गावाला लागूनच नदीकडच्या अंगान महारपूरा होता. या मोहल्ल्यात वेगवेगळे लोक रहात होते. कोणी कांबळे होते. एक दोन ढेंगळे होते काही वेल्हाळ होते तर काही घरे वानखडयांची होती. या मोहल्ल्यात अस्पृश्यांची जवळजवळ पाचपन्नास घरे होती. त्यामध्ये एक घर धुत्रे नावाच्या माणसाचं होतं.

या मोहल्ल्यातील माणसे काबाड कष्ट करुन मिळेल ती मजूरी करुन पोट भरीत व प्रपंच चालवित होती. कोणी माती गोटयाचं काम करी, कोणी वावरा शेतात काम करी. आणि या अस्पृश्यांच्यात एक घर जरा टापटिपीचं होतं. या घराच्या अंगणात गर्द हिरव्या काळ्या रंगाचं कडूनिंबाच झाड होत. दुस-या बाजूला गुलमोहर होता. या घराचा मालक होता भिकू धुत्रे. हा तसा गरिबच होता. पण तो फलटणीत असल्यामुळे जरा व्यवस्थित होता. त्याशिवाय त्याचा भाऊ आणि मेव्हूणा मुंबईस होते. त्यामुळे भिकूने एक दोन वेळा मुंबई पाहिली होती. त्यामुळे तो खेडवळ नसल्यामुळ त्याने धुत्रे हे नाव सोडून वलंगकर हे नाव लावलं होते.

भिकूची बायको रुक्मिणी ही मुळदा गरिबीतच वाढली होती. त्यामुळे ती सर्व घरातील काम करायची गोव-या वेचून आणणं, शेणाच्या गोव-या थापणं आणि मोलमजूरीची छोटी मोठी काम करीत असत. भिकू रुक्मिणी या दांपत्याना चार मुले होती त्यापैकी तीन मुली होत्या व एक मुलगा थोरली मुलगी त्याची दापोलीला दिली होती. त्यामुळे भिकूवर तीन मुलांचीच जबाबदारी होती. रमा मोठी मुलगी होती.

रुक्मिणीचा रमावर फार जीव होता. सारखी ती तीला रामी रामी करायची रामीही आपल्या आईला घरकामात भरपूर मदत करत होती संपूर्ण भिकूच घरचं असं राबत असत. संध्याकाळी मुलं झोपली की भिकू आणि रुक्मिणी आपल्या संसारासंबंधी चर्चा करीत असत झोपलेल्या रामीच्या चेह-याकडे पाहून रुक्मिणी म्हणायची थकून भागून झोपली माझी रामी ! तेव्हा भिकू रुक्मिणीला म्हणायचा तिला एवढी काम करु देऊ नको पोरगी बघ कशी वाळून गेलीया. तेव्हा रुक्मिणी म्हणात, ती ऐकेल तेव्हा ना नको म्हटलं की जीव दुःखतो तीचा अशी बराच वेळ दोघात चर्चा चालत असे आणि रुक्मिणीचा मायेने पिकलेला हात भरल्या डोळ्यानी रमाच्या तोंडावरुन फिरत राहयचा.

रुक्मिणी ही अत्यंत समजूतदार बाई होती. गरिबीत जन्माला आली होती आणि दारिद्र्यात वाढली होती अशून रहावं, आईबापाच्या नावाला बट्टा लावू नये. स्वच्छ मनानं जगावं व मुलाबाळाना हिच इज्जत द्यावी अशा संस्कारात वाढली होती रुक्मिणी रामीला सांगत होती. " रामी बेटा तू आता मोठी होत आहेस तू तुझ्या वयाच्या मानानं खूप समजूतदार आहेस. बेटा कष्टाशिवाय मनुष्य मरतो. कष्टान मरत नाही. बेटा आयुष्यात कोणाचं उणं चिंतू नये. कोणाचं वाईट चिंतू नये.

रामी कोणाची निंदा करू नये, कोणाचा द्वेष करू नये आपलं काम नेटान करत रहावं .'

रुक्मिणी रामीला सांगत पण सर्वच गोष्टी रामीला कळत नव्हत्या पण तीच्या घरात लग्नाची बोलणी निघाली की रामी लाजत असे.

रमाच बालपण व आईबापाच्या गरिबीत सुखाच चालले होते. संसार आटोपशीर असल्यामुळे गरिबीतही या घरात सुखे फुलत होती. भिकूलाही कोणतं व्यसन नव्हतं. त्यामुळे घर छान चाललं होतं. नवरा बायको एकमेकांच्या सुखासाठी खूप झटत होते. पण एक अशुभ दिवस उगवला आणि वलंगराच घर तडकून गेल.

रुक्मिणी आजारी पडली आणि एखादी वेल करपावी तशी करपून जायला लागली ती आजारी पडल्याची बातमी मोहल्ल्यात पसरली तिला सर्व बायका बघून जाऊ लागल्या तीला धीर देऊ लागल्या परंतू तीचा आजार वाढतच गेला आणि एक दिवस घरातील सर्व माणसे हजर असताना शेवटचा श्वास घेतला.

रुक्मिणीचे अचानक निधन झाल्याने भिकूचे अर्धअंगच लुळ पडते. कारण रुक्मिणी ही त्याच्या संसाराचा निम्मा गाडा ओढत असते. रुक्मिणीच्या मरणाने तिचा भाऊ गोविंद पुरकर धाय मोकलून रडत असतो. रुक्मिणीने आपल्या पोरांची जबाबदारी त्याच्यावर टाकलेली असते आणि रमा, गौरा आणि शंकर ही मुलं आता आईविना पोरकी होतात.

रमा मोठी होत असताना घरातील संपूर्ण भार तीच्यावर पडतो. तीला आता बापाचीही आई व्हायचे असत आणि गौरा आणि शंकर यांचीही आई व्हायच असत रमा आई आई करीत असतानाच स्वत:ला सांभाळते आणि स्वत:ची आसवं स्वत: पुसते आणि या

या मरणाचा परिचय करून पुढची वाट चालू लागते.

रमाने बापाला हिम्मत दिली पण तिचा बाप भिकू हा बायकोच्या मृत्यूने खचून जातो. त्याच्यावर कोसळलेले दु:ख तो स्वत:च्या दुबळया हृदयान पेलू शकत नाही. एक दिवस त्याची प्रकृती हाताबाहेर जाते. आणि त्याच्या छातीत कळा येऊ लागतात. त्याने आपलं भविष्य ओळखून आपल्या मुलाना जवळ बोलावून घेतलं. रामी मोठी होती तिला त्या प्रसंगाचा अर्थ कळत होता. आईच्या मृत्यून तिच्या काळजाचा एक लचका तोडला होता तर तिच्या काळजाचा दुसरा लचका तोडायला बापाचा मृत्यू पुढे उभा होता.

भिकू छातीत येणा-या कळा चुकवून रमाला शेवटचा सांगत होता.

" रामी ! रामी बेटा ! तुझ्या आईन आम्हाला तुझ्यावर सोपवलं होतं. आता या दोन लहान जीवाना मी तुझ्यावर सोपवून जातो. या पिलाना अजून पंखही फुटले नाहीत बेटा ! त्याना सांभाळ

त्यांना आईबाप आठवू देऊ नकोस, रामी कालवर तू केवळ त्यांची आई होतीस !' आता तूच त्यांचा बापही व्हायचं रमा ! तुझ्या या लहान लहान पंखावर मी या दोन अजान आयुष्याची ओझी ठेवून जातो आहे. वाईट वाटतं रामी, पण इलाज नाही आता इलाज नाही सांभाळ रामी बेटा सांभाळ ."[२]

असे सांगत असतानाच भिकूचे डोळे मिटतात पण रमाला रडू येत नाही ती सुन्न होते. तिच्या कंठामध्ये शब्दच येत नाही तिच्या खेळण्याचा वयात तिला आईबापाच्या मरणानी पोरक केलं त्या मरणानी ती अंतर्मुख होते. त्यामुळे रमा लहान वयातच प्रौढ होते. आईबापाविना पोरकी झालेली रामू एवढच म्हणतली की, लहानपणी कोणाचेही आई-बाबा मरू नयेत आणि ती आपले तोंड स्वत:च्या हाताच्या तळव्यानी झाकून घेते.

रमा आई वडिल वारल्यानंतर मुंबईला तिच्या काका आणि मामासोबत येते. तिच्या आईच्या शिकवणीने ती अतिशय चांगल्या पद्दतीने रहाते. तिच्या स्वभावात मार्दवपणा भरतो. तीच मन तरी अगदी भरलेल्या पाण्याच्या तळ्यासारख असते. ती लहानाची मोठी होत होती तीला आईवडिलांची आठवण झाली की ती घायाळ होत असत आणि आपल्या मनाशीच म्हणायची.

" आई तु का गं आम्हाला सोडून गेलीस. माझ्या लग्नाला तर खुप दिवस होते. मग अशी घाई का केलीस ? माझा संसार तू मांडून देणार होतीस ना ? पण तू मला सोडून गेलीस. माझं काही चूकलं होत का आई "[3]

अशा आठवणीन रमाच मन आक्रोश करायचं आणि बघता बघता रमा नऊ वर्षांची होते. त्याकाळच्या रूढीप्रमाणे तिच्या लग्नाच वय होते. त्यामुळे तिचे वलंगकर काका आणि गोविंदपूरकर मामा यांच्यात तिच्या लग्नाविषयी चर्चा चालू होते. रमा सोज्वल, सात्वीक आणि शांत वृत्तीची असल्यामुळे तीला चांगल स्थळ पाहतात. परंतू त्यांच्या मनासारखं जुळूनच येत नसते.

रमाईचे बालपण आणि बालपणीच सोसावे लागणारे आघात हे मनोहरानी अतिशय समर्पकपणे आपल्या कादंबरीतून आणालेले आहे.

त्याचप्रमाणे रमाच्या लहानपणाविषयी अशाच आठवणी युगप्रवर्तक या कादंबरीत दिसतात. अशीच एक आठवण. रमा ओटीवर एकटीच बसलेली असते तिच्या घरात खुप बायका जमा होतात. त्या सर्व बायका रमाच्या आईबरोबर वटसाविश्रीला जाऊन घेतात पण रमा गेलेलीनसते ती घरात बायका जमल्यानंतर बायकामध्ये चाललेली चर्चा ओटीवर बसून ऐकण्याचा प्रयत्न करते पण ती चर्चा तिला काही कळत नाही.

घरातील बायका बाहेर निघून जाताना रमाकडे पाहून गालातल्या गालात हसतात. पण का हसल्या ते रमाला कळत नाही पण तेवढ्यात

तिची आई बाहेर येते आणि म्हणते " रमा तू मोठी पायगुणाची आहेस, हे तुला असा नवरा मिळणार की, एवढेच बोलते आणि थांबते. यावरुन आत काय चर्चा झाली. त्याची कल्पना रमाला येते. आणि ती आईला कसला नवरा मिळणार म्हणून विचारते. तेव्हा आई सांगते गणपती सारखा । ज्याचे कान हत्तीच्या कानासारखे आणि पोट गणपतीसारखे तेव्हा रमा थोडी निराश होते. आणि असल्या मुलाशी लग्नच करायचे नाही तर आपला नवरा हा गोरागोरा पान पाहिजे अशी ती आईला सांगते.

अशीच आणखी एक आठवण सांगता येईल, रमा दापोलिला वडिल वारल्यानंतर चुलत्यांच्याबरोबर मुंबईला येते आणि ती भायखळ्याच्या चाळीत रहाते. तिचे गोविंदपुरकर मामाही मुंबईतच रहात असतात आणि तेही अधून मधून रमाकडे येत असत. एक दिवस अचानक घरी येतातआणि रमाच्या काकाना काही तरी सांगून जातात.

दुसरे दिवशी रमाला लुगडं नेसायला लावतात आणि काही सूचना करतात. त्यामुळे रमाला मामा, काल काकाना काय सांगून गेले होते ते कळते. थोडयाच वेळात तिचे मामा काही मंडळीना घेऊन घरी येतात. चहापाणी होते. चहापाणी झाल्यानंतर रमा सांगीतलेल्या सूचनेप्रमाणे वागते आणि रमाच्या मामांच्याबरोबर आलेले एक गृहस्थ म्हणतात आम्हाला मुलगी पसंत आहे पंचाना बोलावून पुढचा कार्यक्रम पार पाडू या.

या दोन्ही कादंबरीतून रमाचे घडत गेलेले बापण वेगवेगळया आठवणीतून दिसून येते.

रमाईचे बालपण " रमाई " आणि युगप्रवर्तक या कादंब-यातून दिसते. परंतू बाबासाहेब आंबेडकराचे बालपण रमाईमध्ये दिसत नाही ते युगप्रवर्तक या कादंबरीत दिसून येते ते असे.

युगप्रवर्तक या कादंबरीत सुरुवातीलाच बाबासाहेबांचे बालपण पहात असताना त्यांच्या वडिलानी लहानपणी गोष्टी सांगीतलेल्या त्याना दिसतात. बाबासाहेब आंबेडकर हे लहान होते आणि त्यावेळी त्यांचे वडिल त्याना त्यांच्या जन्माविषयी गोष्ट सांगत होते ती अशी

" सूर्य चंद्र आणि इतर ग्रह यांची युती होऊन असा एक महायोग आला की, त्या महायोगाच्या शुभप्रसंगी एका विवक्षित वेळी जर एखादी स्त्री गर्भवती झाली तर तिला जो पुत्र होईल, तो अत्यंत पराक्रमी, भाग्यशाली होतो हा महायोग साधण्याचं मी मनात ठरवलं.

या महायोगावर जन्मणाऱ्या अपत्यांना जे इतर ग्रह पीडा करणारे आहेत. त्यांची शांती करण्यासाठी जपजाप्य व अनुष्ठाने करावी लागतात ती मी सर्व केली .

ज्या दिवशी महायोगाची सुरुवात झाली. त्यादिवशी मी शेवटचं अनुष्टान केलं. अनुष्ठान समाप्तीच्या आदल्या रात्री पौर्णिमा होती. पौर्णिमेच पांढरशुभ्र चांदणं सगळीकडे पसरलं होतं. त्या रात्रीचा तेजपुंज चंद्र तसा ते:जपुंज चंद्र पूर्वीइतका प्रकाशलाच नव्हता. आणि प्रकाशला जरी असला तरी मी तरी कधी पाहिला नव्हता. अनादिकाला-पासून चंद्राच तेज कायमचं आहे. दर पौर्णिमेला तो असाच प्रकाशित असतो. माझ्या पहाण्याच्या दृष्टीमुळे चंद्राचा माझ्यावर परिणाम झाला.

अनुष्ठान संपवून मी बाहेर आलो. त्या चंद्रप्रकाशात मला तुझी आई उजळून दिसली. तिच्या तेरा अपत्याच्या वेळी इतकी प्रसन्न अशी ती कधी मला दिसलीच नव्हती. संबंध दिवस ती मला एका वेगळ्याच आनंदात दिसत होती. दररोजची तिची नैमित्तिक काम झटपट करताना तिच्या सुखद भावना मला मोहक वाटू लागल्या होत्या. अनुष्ठान समाप्तीन माझं अंतर्बाह्य मन तेजाळून निघालं. सिध्दीच्या सरोवरात माझं मन राजहंसासारखे स्वैरपणे संचार करू लागले.

" भीमा" मी हाक मारली तिची कळी खुलली, चित्तात पण काहीतरी कालवाकालव झाली तिने लाजत, पण काहीसं हसत मला म्हटलं. -

मला माहित आहे...
चौदावं रत्न उद्या पहाटे उष:काल समयी

जन्माला येणार आहे माझ्या महायोगाची समाप्ती पण आजच झाली. आपल्या पोटी महापुरुष जन्माला येणार आहे भीमा महापुरुष ." [४]

भीमरावांचे वडिल भीमरावाना लहानपणी गोष्ट सांगत असताना भीमरावाना असे वाटायचे की खरोखरीच मी महापुरुष आहे काय. ही खात्री करुन घेण्यासाठी ते स्वतःच आरशात आपले शरीर पहात असत त्यांचे कान रुंद व घवघवीत होते. त्याची पाळे मोठे होती. त्यामुळे त्याना ती कर्णाच्या अभेद्य कवचासारखी वाटत होती. त्यामुळे ते आपल्या मित्राना म्हणत की तुम्ही मी सांगितले ते ऐकले पाहिजे भीमराव हट्टी असल्यामुळे त्याचे मित्र त्याचे म्हणने ऐकत असत.

भीमरावांचे वडिल सुभेदार असल्यामुळे त्यांच्या घरात एक प्रकारची शिस्त लागलेली होती. देवाची प्रार्थना झाल्याशिवाय कोणाला जेवायला परवानगी नसत. घरातील सर्व लोक जेवत असताना भीमरावांचे वडिल त्याना रामायण महाभारतातल्या गोष्टी सांगत असत. एकदा त्यानी भीमाला स्वातंत्र्य भक्ताची कविता म्हणून दाखविली होती.

धों धों धों धो सिंधू उसळला त्यांच्या रक्ताचा
स्वातंत्र्याचा भक्त रंगला भगव्या झेंड्याचा ।

वरील कविता म्हणून झाल्यावर त्याना त्यांचे वडिल म्हणाले " भीमा रणावीना कुणाला स्वातंत्र्य मिळालं आहे काय ? तुही एका सैनिकाचा मुलगा आहेस. तुलाही मर्दुमकी गाजविली पाहिजे पण तुझी मर्दुमकी मला रणांगणात नको आहे तू फार शिकल पाहिजे. तू तुझ्या कुळाचा उध्दार केला पाहिजेस तुझ्या जातिबांधवाच्या दास्यशृंखला तू तोडल्या पाहिजेस आणि त्या तोडण्याकरिता अवश्य कवचकुंडल म्हणजेच विद्या । ही विद्या तू संपादन केली पाहिजेत, असा तुला आशीर्वादच आहे तुझ्या काकांचा । " [५]

भीमरावांच्या वडिलांचा श्रध्दा आणि भक्तीवर जास्त भर होता. भीमरावांच्या आयुष्यात जे असेल ते घडणारच होते. त्यांचा भविष्यकाळ एक विशिष्ट प्रकारचा आकार घेत होता. आणि हे फक्त त्यांचे त्यानाच कळत होते.

भीमरावांची आई म्हणजे मायेचा एक विशाल सागर होता. पण त्यांच्या लहान वयातच दुर्दैवाने तो आटला होता आणि त्यामुळे त्यांची हयात असलेली भावंडे आईविना पोरकी झाली होती. तेव्हापासून त्यांच्या घराचे वैभव. भक्तिपूजा आणि भजन घराबाहेर गेले होते. त्या सर्व भावंडाची आई आता मीरा आत्या झाली होती आणि त्याचवेळी त्यांच्या वडिलांची नोकरी संपली होती.

भीमराव हे लहानपणी फार खोड्या करत असत. पण ते सर्व त्यांची आई माफ करायची एकदा ते असेच देवळीकरना त्रास देत होते. तेव्हा देवळीकर रागाने भीम्या तुला पटकी कशी येत नाही असे रागाने म्हणाले होते ते भीमरावांच्या आईला समजताच त्यांची आई रडू लागली ज्याच्यासाठी घरात उपासतापास करुन घरात मंगलमय वातावरण निर्माण करत होती. वंशाचा दिवा सांगणा-या तिच्या भावोजीची तिनं चरणधूळी झाडली होती. त्या भीमरावाना देवळीकरवी पटकी कशी येत नाही असे म्हटल्याचे भीमरावांच्या आईला परम दु:ख झालं त्यावेळी भीमरावांची आई भीमरावांना आपल्या पदराखाली घेऊन ती दु:खानं रडत होती.

भीमरावाना त्यांच्या आईच-सुख त्यांच्या नशिबी नव्हतेच पण भीमराव आपला पोरगा कुणी अद्वितीय पुरुष होणार याबद्दल तीच्या मनात तीळमात्र शंका नव्हती.

भीमरावाना त्यांच्या आईवडिलांनी नुसते जन्म देऊन सोडले नव्हते, तर त्यांच्यावर चांगले संस्कार केले होते. त्याना प्रेम दिले होते. घडविले होते. पण ते स्वत:साठी घडवित नव्हते. तर दुस-यासाठी दिनदुबळ्या समाजासाठी । आपल्या समाजाच्या कल्याणासाठी आणि स्वराज्यासाठीच त्याची आई लोकानी तक्रारी केलेल्या सहन करीत असत मात्र भीमरावानी

आपल्या आईवडिलांसाठी फक्त दोन थेंब अश्रु गाळले होते.

भीमरावही विचारवंत होते. ते मनात सारखे विचार करत की, आपल्या मुलांवर आईवडिलांच प्रेम असते. पण मुलांची काही कर्तव्य आहेत का ? असा प्रश्न त्याना पडे त्यांची आई वारल्यानंतर त्यांच्या वडिलानी दुसरे लग्न केले. त्यांच्या सावत्र आईचे नाव जिजाबाई हे होते. त्यांचे वडिल सावत्र आईला घेऊन सातारा-याला आले. तेव्हा जिजाबाईच्या अंगावरील दागिने पाहून भीमराव संतापले. आणि ओरडले. माझ्या आईचे दागिने काढून ठेव नाहीतर तुझ डोके फोडीन. जिजाबाईच्या अंगावरील दागिने भीमरावांच्या पहिल्या आईचे दागिने होते.

भीमरावही बालपण गरिबीत घालवीत होते. त्या गरिबीतून ते शाळा शिकत होते त्यांचे वय सतरा असताना ते नववीच्या वर्गात होते. त्यावेळी अस्पृश्य समाजात नववीपर्यंत शाळा शिकलेला मुलगा दुसरा कोणीही नव्हता भीमराव नववी शाळा शिकत असतानाच त्यांच्या घरातील माणसानी त्यांच्या लग्नाचा बेत आखला होता. भीमराव व रमाई यांच्या लग्नाचा प्रसंग रमाई या कादंबरीत असा दिसतो.

भीमराव आणि रमा यांच्या लग्नांची तारीख जाहिर होताच भायखळ्याच्या इंम्प्रुव्हमेंट चाळीत आणि परळच्या चाळीत चर्चा चालू होते. रमाचं लग्न कोणाशी ठरलं ? रामजी सुभेदारांचा मुलगा भीमराव खूप शिकला आहे. यांच्याशी ठरलं. रमा अनाथान गांजली होती. ती अशिक्षीत असूनही तीला नववीपर्यंत शिकलेला नवरा मिळाला होता. त्यामुळे छान झालं तिचे अशी सर्वत्र चर्चा चालू होती. आणि अखेर लग्नाचा दिवस उगवतो.

भीमराव आणि रमा यांच्या लग्नाचे स्थळ असते. भायखळ्याची बाजार ओळ. लग्नाच्या वेळी रमाचे वय नऊ वर्षाचे होते. तर भीमरावाचे सतरा वर्षे वय होते. दोन्हीकडील व-हाड मंडळी बाजारात येतात.

एका बाजूला नव-याकडील तर दुस-या बाजूला नवरीकडील मंडळी उभी राहतात. बाजारातील विक्रीसाठी माल ठेवायच्या चबुत-यावर वरवधू बसले होते त्या चबुत-याखालून वाहणा-या गटा-यातील पाण्याची दुर्गंधी येत होती. भीमरावांचे आणि रमाचे लग्न होत होते. घाई करायची होती. बाजार सुरु होण्यापूर्वी सर्व कार्यक्रम पूर्ण करायचा होता. सर्व माणसे सुशिक्षीत असलेल्या भीमरावांच्याकडे कौतूकाने पाहत होती. नवरा नवरीच्या मित्र मैत्रिणीमध्ये हसणे खिदळणे चालू होते.

भीमरावाचे आणि रमाचे लग्न लागले होते. आजूबाजूच्या कुणाच्याही मुलीला मिळाला नसेल असा नवरा रमाला मिळाला होता. रमालाही आनंद झाला होता. त्या आनंदाच्या भरात तीला तीच्या आईवडिलांची आठवण होत होती आणि ती आपल्या मनातच म्हणत होती.

" आज माझी आई असायला हवी होती
आज माझे बाबा असायला हवे होते.

माझ्या आईबाबाना आज केवढा आनंद वाटला असता. आपल्या पोरीच्या वाटयाला आलेल्या या सुखान त्याना गगन ठेंगण झाल असतं. सर्वात जास्त शिकलेला जावई आपल्याला मिळाला. याची त्याना केवढी खुशी झाली असती ? हे सुख भोगायला माझे आईबाबा हवे होते ".[६]

अशा आठवणीन रमा घायाळ होत होती. तीच सजवलेले रूप जखमी मोरानं फुलवलेला पिसारा असावं तस होतं. तीला एक झोका अंधरात तर दुसरा उजेडात न्हेत होता. अशा अवस्थेत रमा भीमरावांच्या गळयात हार घालते आणि ती त्यांची पत्नी होते.

रमान भीमरावांच्या नावाचं कुंकू लिहून एका नव्या वळणावर पाऊल ठेवले होते तिचे लग्न झाले त्यावेळी त्या लग्नाचा अर्थ तीला कळत नव्हता आणि पुढे काय होणार हे कोणालाच सांगता येत नव्हते.

कारण जन्माला आलेले सारे प्रश्न काळोख्या मुठीत बंद झाले होते.

रमाच्या जीवनात काय घडणार आहे हे कोणालाच माहित नव्हते. मात्र एक खरे होते की रमा एका वादळात सापडली होती. त्यामुळे ते वादळ नेईल तिकडे तिला जावं लागणार होत. रमा वादळाची सावली झाली होतीपण हे कोणालाच माहित नव्हते. कारण सर्वच निर्णय भविष्याच्या काळोखानं दडवून ठेवले होते.

रमाचे आता पहिले आडनांव वलंगकर हे नाव बदलले होते. तिच्या नावापुढे आता आंबेडकर हे नाव लागते आणि रमा आता रमाबाई आंबेडकर या नावाने ओळखली जाऊ लागते. तिचा संसार चालू होतो. तिच्या घरात रामजी सुभेदार त्यांचीच बहिण पांगळी मीराबाई भीमरावांची सावत्र आई जिजाबाई असे कुटुंब एकत्र होते. रमाबाईच्या काका आणि मामा यांच्या घरापेक्षा तिला दिलेल्या घराच वातावरण वेगळे होते. या घरात शिक्षण हेच सर्वस्व होते. भीमरावांच्या शिक्षणाभोवती सारे घर फिरत होते. रमाबाईला मीराबाई आईप्रमाणेच व्यवहार सांगायची. रमाबाई सात्वीक होत्या पण लग्न झाल्यामुळे त्यांच्यावर आता एका मोठ्या संसाराची जबाबदारी पडली होती. मीराआत्या तिला भीमरावांच्या अभ्यासाबद्दल सांगे. तेव्हा तिला भीमरावांचे कौतूक वाटायचे अभिमान वाटायचा.

रमाबाई भीमराव यांच्या लग्नानंतर भीमरावांचा मॅट्रीकचा निकाल पास म्हणून लागतो. त्यामुळे सर्वानाच भीमरावांचा गर्व वाटतो. रमाबाईच काळीज तरी सुपाएवढे होते. ती आपल्या सुपाएवढ्या काळजाने आपल्या नवऱ्याला ओवाळते. तीला नवऱ्याचे कौतूक कोणत्या शब्दात करावे हेच कळत नाही पण ती शब्दाने बोललीच नाही. तर नवऱ्याच्या कौतूकासाठी रमाबाईचे डोळे काय ते बोलत होते.

भीमराव मॅट्रीक पास झाल्यामुळे त्यांचा सत्कार होतो. त्यावेळी सी. के. बोले अध्यक्ष तर केळूस्कर गुरूजी वक्ते होते. भीमराव उत्सवमुर्ती होते. लोकानी भीमरावाना खूप हार घातले. नव-याचे कौतुक लोकानी केलेले पाहून रमाबाईचं भावविश्व फुलत होते आणि आनंदाच चांदणं तिच्या वृत्तीच्या ताजव्यात फुलत होते.

भीमरावानी रमाबाईला आपल्या शिक्षणासंबंधी एकान्तात विचारले होते. तेव्हा रमाबाई एखादी नदी महापूरानं फुलावी तशी फुलते आणि म्हणते. तुम्ही खूप मोठे आहात. मला सांगता येत नाही. एवढे मोठे आहात. खूप शिका, खूप मोठे व्हा, कोणाला सांगता येणार नाही एवढे शिका आणि हे सांगत असतानाच भीमरावांच्या झेपावत निघालेल्या प्रवासाला साथ देण्याचे वचन रमाबाई देते.

रमाबाईच्या आयुष्याला आता वेगळे वळण लागले होते. एका अनोख्या प्रवासात रमाबाई निघाली होती. तीन आपल्या सुखाला वाढवण्याचा निश्चय केला. कारण माणसाच्या जीवनात एकेक सुख असं येते की ते पूर्वी आलेल्या शेकडो दुःखावर मात करते आणि तिच प्रतिज्ञा रमाबाई करते आणि एका अज्ञात प्रवासाला निघते.

रमाबाईच्या वाटयाला काय येणार आणि ती हरणार की तो प्रवास पार करणार हे काही कळत नव्हते. प्रश्न तर नवे होते पण त्या प्रश्नाना उत्तरे नव्हती. त्यामुळे तीला थांबताही येत नव्हतं. वादळाच्या सावलीला आता पर्याय नव्हता कारण थांबणे हाच मृत्यू ठरला असता.

भीमराव आणि रमाबाई यांच्या लग्नानंतरचे वर्णन युगप्रवर्तक या कादंबरीतही येते ते पुढीलप्रमाणे.

अस्पृश्यांच्या भविष्यकाळावरचा पडदा दूर करणारा पति रमाबाईला मिळाला होता. रमाबाई भाग्यवान होती. म्हणून तीला असले पति मिळाले होते. रमाचं रूपही सुंदर होते आणि तिच मन तर समुद्रासारखं विशाल होत. रमाबाईचे माहेर कबिर पंथातले असले तरी रमाबाईना ते ब्राह्मण वाटायचे त्यांच्या घरातील स्वच्छतेविषयी त्यांचे

भारी लक्ष होते.

भीमरावांच शिक्षण चालूच होते. ते नियमीत पास होत होते. त्यामुळे रामजी सुभेदार आनंदात होते. तरी सुध्दा त्याना काही अपेक्षा होत्याच एक दिवस रामजी सुभेदाराना पाहिजे होता तो दिवस उगवला. भीमरावांच्या बी. ए. च्या परीक्षेच्या निकालाचा दिवस भीमराव बी. ए. पास झाले होते आणि मुलगा पास झाल्याच्या आनंदात रामजी सुभेदार आनंदाने वेडे झाले होते. त्यानी बाजारातून पेढे आणले आणि देवघरात धूपदिप लावून ते सद्गदीत स्वराने म्हणाले.

" परमेश्वरा, तु माझी इच्छा आज पूर्ण केलीस, आता माझी एवढीच इच्छा, आहे की तू माझ्या भीमाला नेहमीच सुखी ठेव । "[७]

भीमरावांच्या वडिलानी मुलग्याला सुखी ठेवण्याची इच्छा परमेश्वराकडे मागीतली असली तरी त्यांची आणखी एक इच्छा होती. ती म्हणजे आपल्या मुलग्यान नोकरी करावी आणि नोकरी करताना रिकाम्या वेळेत अस्पृश्य समाजात शिक्षण प्रसाराचे कार्य करावे. योगायोगाने त्याचवेळी बडोधाचे नरेश सयाजीराव गायकवाड हे मुंबईला येतात आणि भीमरावानी लगेच केळूस्कर गुरुजींच्या मदतीने गायकवाडांची ~~भेट~~ भेट घेतली. त्यावेळी गायकवाडानी भीमरावाना संस्थानात नोकरी देण्याचे कबूल केले होते.

भीमराव बी. ए. पास झाल्यानंतर बडोधाच्या गायकवाडनी कबुली दिल्याप्रमाणे काही दिवसानी बडोदा संस्थानात नव्या आणि पहिल्या नोकरीवर हजर होतात. पण तिथे त्यांची खाण्यापिण्याची गैरसोय होते त्यानी कसेबसे दोन तीन दिवस महारवाडयात काढले. परंतू पंडित आत्माराम नावाचे स्कुल इन्स्पेक्टर त्यांच्या मदतीला येतात. त्यांनी स्वत:च्या घरी भीमरावांच्या रहाण्याची व्यवस्था केली होती. पण ते घर कचेरीपासून बरेच दूर असल्यामुळे भीमरावानी सोडले होते.

भीमरावाना बडोद्याला जी नोकरी दिली होती ती नोकरी ते अत्यंत व्यवस्थितरित्या करत होते. नोकरी करत असताना उरलेल्या वेळेत ते पुस्तके वाचून आपले ज्ञान वाढवत होते. एक दिवस त्यांच्या हातात अचानक तार येते. ती तार ते गडबडीने वाचतात. तार वाचताना त्यांच्या डोळ्यासमोर अंधार उभा रहातो. त्यांचे वडिल आजारी होते ते ताबडतोब मुंबईला येण्यासाठी स्टेशनवर येतात. पण वडिलाना खाण्यासाठी बर्फी घेण्याच्या गडबडीत त्यांची गाडी चूकते आणि ते दुस-या दिवशी मुंबईला येऊन पोहचतात.

सुभेदारांची प्रकृती अधिकच खालावलेली होती. घरातील मंडळी त्यांच्या भोवताली बसलेली पाहून भीमरावांच्या मनात एकदम धस्स झाले होते. त्याना त्यांच्या वडिलानी खुणेनीच जवळ बोलावले आणि त्यांच्या पाठीवरुन मोठया प्रेमाने हात फिरवला आणि तो भीमरावाना झालेला त्यांच्या वडिलांचा शेवटचा स्पर्श असतो आणि भीमरावांच्याकडे पहात असतानाच त्यांच्या वडिलाचे डोळे शांतपणे कायमचे मिटले जातात.

भीमरावांच्या वडिलांची प्राणज्योत मावळताच त्यांच्या घरात एकदम रडारड सुरु होते. भीमरावाना तरी स्वत:वर वज्राघात झाल्यासारखे वाटले आणि ते रडत असताना त्याना वडिल हयात असतानाचे प्रसंग आठवू लागतात ज्यावेळी भीमरावानी आपल्या वडिलाना आईला मारा म्हणून सांगितले होते त्यावेळी वडिल त्यांच्या आईला म्हणाले.

" हे बघ भीमाचे कान आणि पोट गणपतीसारखे आहे. त्याच्या हातावरच्या रेषा भाग्यवंताच्या रेषा आहेत तो भाग्यवान आहे. त्याचा जन्म तुझ्या पोटी झाला आहे यातच धन्यता मान ! तू यांच्या खोडया सहन कर आणि यापुढे त्याला कधी मारु नकोस समजलं ! ".[८]

भीमरावाना भाग्यवान म्हणणाऱ्या त्यांच्या वडिलाना मुलग्याचे भाग्याचे दिवस पाहता आले नाहीत. म्हणून भीमराव स्वत:च म्हणतात.

" माझ्या वडिलांच्या मृतदेहाकडे पहात अनेक आठवणींनी माझं मस्तक सुन्न झालं होतं. माझ्या डोळ्यातून अश्रुंची अखंड धार चालू होती जेव्हा जेव्हा मी जीवनाचा विचार करतो. तेव्हा तेव्हा मला असं वाटतं की माणसाचं जीवन म्हणजे जीवनमृत्यूच्या तासातून वाहणारी एक नदीच आहे. किंबहूना जगातील प्रत्येक मानव आपल्या आयुष्यातील प्रत्येक क्षण मृत्यूचं बोट धरुनच घालवीत असतो ".[१]

भीमरावांच्या वडिलांच्या मृत्यूनंतर त्यांच्या जीवनात एक महत्वपूर्ण घटना घडली ती म्हणजे सयाजी महाराज एकदा मुंबईला आले होते आणि भीमराव बडोद्याच्या रहाण्याच्या आपल्या गैरसोयीचे प्रकरण महाराजांच्या कानावर घालण्यासाठी भेट घेतात. पण हे प्रकरण सांगीतल्यावर भीमरावांचे इंग्रजी भाषेवरील प्रभूत्व आणि सुंदर अक्षर पाहून त्याना महाराजानी कोणत्या भाषेचा अभ्यास करणार असे विचारले असता लगेच भीमरावानी समाजशास्त्र, अर्थशास्त्र, आणि पब्लीक फायनान्स हे विषय सांगितले ते महाराजाना आवडले त्यावेळी योगायोगाने महाराजाना बडोद्यातील काही हूषार विद्यार्थी अमेरिकेला पाठवायचे होते आणि त्यानी भीमरावाना त्यासाठी अर्ज करण्यास सांगून भीमरावांची निवड केली. अमेरिकेत जाण्यासाठी आपली निवड झालेली ऐकून कंपायमान होतात आणि अखेर त्यानी अमेरिकेला जाण्याची तयारी केली.

भीमरावानी कोलंबिया विद्यापीठात उच्च शिक्षण घेण्यासाठी हिंदूस्थानाचा किनारा सोडला. परत त्यांचे पाय त्या किनाऱ्याला तीन वर्षांनी लागणार होते. त्याना पाठवण्यासाठी धक्क्यावर रमाबाई, बाळाराम, आनंदराव, मीरा आत्या आणि लक्ष्मीबाई हे सर्वजण आले होते. त्याशिवाय त्यांची मित्रमंडळी आली होती त्या सर्वांच्या डोळ्यात अश्रु जमा झाले होते रमाबाई तरी वारंवार डोळ्याला पदर लावीत होती. ते पाहून भीमराव भावनावश झाले होते. पण ते स्वत:ला सावरत होते.

अखेर भीमरावाची बोट किना-यापासून दूर जाऊ लागली. बोट हेलकावे खात तसे त्यांचे मनही हेलकावे खात होते. धक्यावरची माणसे त्याना दिसेनाशी झाली. तेव्हा त्याना दिसत होते ते म्हणजे बोटीच्या चहूबाजूनी फक्त पाणी, बोट जशी पुढे जाऊ लागली तसा त्यान ा एक आवाज ऐकू येतो. हे बघ भीम्याचे कान आणि पोट गणपतीसारखे आहे. हा आवाज त्याच्या वडिलांचा असतो. त्याना भास होतो आणि ते जागे होतात आणि ते स्वत:च्या मनाशीच म्हणतात.

" बाबा, तुमची स्मृति मी कधीही विसरणार नाही, अतिउच्च अशा " फॉरिन डिग्री " मी मिळवेन । मी बॅरिस्टर होईन आणि आपल्या समाजाची सेवा करेन । सयाजी महाराज गायकवाड तुमच्या या अतृप्त इच्छा पूर्ण करण्यासाठीच तुमच्या स्थाने आले आहेत. बाबा, ही तर तुमचीच पुण्याई आहे या तुमच्या पुण्याईच्या जोरावरच मी अमेरिकेला जात आहे. बाबा मला तुमचा आशीर्वाद दया ".[10]

भीमराव आणि रमाबाई यांच्या लग्नानंतरचे वर्णन रमाई या कादंबरीत तुलनात्मक दृष्टया असे दिसते. रमाबाईच्या लग्नाला दोन वर्षे पूर्ण ~~झाली~~ झालेली होती. त्यामुळे तीने सर्वांचा लोभ संपादन केला होता. तीच्याबरोबर लक्ष्मी बहिणीसारखी वागायची चांगली मीराबाई तर तीच्या बरोबर आईप्रमाणेच वागत होती आणि रामजी सुभेदार तर तीला आपली मुलगीच मानीत होते. त्यामुळे आंबेडकरांच घर आता रमाबाईच घर झालं होत. त्यामुळे तिच तिथं घरपण सुरु होत ~~होतं~~. तीच घराशी रक्ताच नातं जुळल होतं. तीच परकेपणाच एक विरळत होत आणि रमाबाई आता आंबेडकर या कुटूंबाच्या झाडाची एकजिव फांदी झाली होती. रमा साधी आणि अडाणी होती. परंतू ती सात्वीक आणि सुंस्कृत होती. त्या घरातील माणसांच्या सुखानाच तीन आपल सुख मानलं होतं. त्यामुळे तीच्या भोवती आंबेडकरांच घर फिरत होतं आणि आता तरी ते घर संपूर्ण रमामय झालं होत

रमाबाईच वागणं पाहून भीमरावाना तीला शिकवाव अस वाटू लागते. तीला तिच्या गरिबीमुळे ती शिकली नव्हती म्हणून भीमराव तीला लिहायला आणि वाचायला शिकवतात. तेव्हा रमा भीमराव कॉलेजमध्ये गेल्यावर दुपारच्या वेळी रमाबाई भीम-रावांच्या खोलीत जाऊन एखादे मराठीचे पुस्तक घेऊन वाचत होती. तीला जास्त काय लिहिता आणि वाचता येत नव्हते. पण थोडेफार जमत होतं आणि त्याचबरोबर तीच्या मनाला हळू हळू नवी पालवी फूटत असल्याचे सुख ती अनुभवीत होती. त्यामुळे सुभेदारांच घर बदलल होतं त्यांच्या घरात आत/नवीन ऋतू सुरु झाला होता.

१९१२ सालातील डिसेंबर महिना होता. त्या दिवशी त्यांच्या घरात एक नवीन जीव जन्माला येतो. रमाबाई आई झाली होती. भीमराव बाप झाले होते त्यामुळे सगळे घर प्राजक्तासारखे फुलले होते. रमाबाईनी आपल्या दु:खावर विजय मिळविला होता. सुभेदार तर लहान मुलासारखे उत्साही झाले होते ते सा-या-चाळीत नातू झाल्याची बातमी सांगत होते. पंगळी मीराबाई तर त्या मुलाच्या आनंदाने कानशिलावर बोटे ठेवून मोडत होती.

आंबेडकरांच्या घरात आनंदाला उधाण आले होते. मुलाचे नाव ठेवायचा दिवस उगवला होता. शेजारच्या बायकानी मुलाच नाव कोणी गोविंदा कोणी वामन कोणी अशोक कोणी केशव ठेवल होतं पण भीमरावाना त्या नावातील एकही नाव आवडलेले नव्हते त्यामुळे एकदा निवांत वेळी बाळाचं पाळण्यात हांडू चालल होत तेव्हा भीमराव रमाबाईला म्हणाले,

* बायानी ठेवलेल्या नावापैकी तुला कोणत नाव आवडलं ?

मला नाही आवडल एकही नाव ।

मी सांगतो एक सुंदर नाव तुला ।

कोणत ।

यशवंत ।

फारच छान रमा म्हणाली

फारच छान केवळ नाही फार अर्थ आहे त्या नावात।
कसा ?
असं जोतिबा फुल्यानी आपल्या दत्तक मुलाच नाव यशवंत ठेवलं होतं.
मग यशवंत हेच नाव ठेवू
रमा आपण जोतिबा फुल्यांचे कोणीतरी लागतो.
जोतिबा फुले हा आपला खरा कुलपुरूष आहे. रमा।
त्यांची आवड तीच आपली आवड।
छान नाव शोधल तुम्ही मला खूप आवडलं आपल बाळ आजपासून यशवंत झालं."

रमाबाईला यशवंत हे नाव आवडते. त्यामुळे भीमरावाना खूप आनंद होतो आणि बाळ त्या दिवसापासून यशवंत होते. त्यांच्या मुलाना त्या घरात नवा सुगंध आणला होता. रमाबाईला यशवंतने आईपण दिले होते त्यामुळे तिचे मन पाखरानी भरलेल्या झाडासारखं झाले होते.

रमाबाईनी लहानपणी खेळाबागडायच्या वयात आईवडिलांचा मृत्यू पाहिला होता त्यामुळे ती दुःखी होती पण तीला झालेल्या मुलग्याच्या आनंदात ती दुःख विसरली होती आणि तिच्यावर तसा प्रसंग परत कधी आलेला नव्हता.

यशवंतचा जन्म आणि भीमराव बी. ए. पास होऊन बडोदा संस्थानात गायकवाड यांच्याकडे नोकरीवर गेले होते. त्यामुळे आंबेडकराचे घर सुखावल होते. पण अचानक रामजी सुभेदार आजारी पडतात. भीमरावाना वडिल आजारी असल्याची तार पाठविली जाते तार पोहचताच भीमराव गडबडीने मुंबईला येतात. घरात आल्यानंतर रामजी सुभेदार आपल्या मुलग्याकडे पाहून या पराक्रमी वाघाची झेप आता कुठे थांबणार नाही याची खात्री करून घेतात आणि रमाबाईला सांगतात की या आग लागेलेल्या जीवाला सांभाळ आणि ते भीमरावाच्या डोळ्यातील तेज पाहतात. नातवाच्या डोक्यावरून हात फिरवतात.

आणि त्यांचे डोळे कायमचे मिटतात.

रामजी सुभेदार वारल्यामुळे आंबेडकर घराण्याचे आडचं मोडले जाते. रमाबाई ज्याना बाप म्हणत होती ते रामजी सुभेदार या जगातून निघून गेले होते. रमाबाईच्या जीवाभावाची माणसे एका पाठोपाठ जात होती तीची सासू तरी ती घरात येण्याअगोदरच निघून गेली होती. रमाबाईवर असा एक घाव बुजत नव्हता तोच दुसरा घाव पडत होता. अश्रूंची एक झड थांबत नाही तो दुसरी सुरु होत होती.

भीमरावांचे वडिल वारुन सहा महिने झाले होते. तेव्हा त्याना अमेरिकेला शिक्षण घ्यायला जाण्याची संधी मिळते. त्यावेळी रमाबाई दुस-यांदा गरोदर होत्या. ते अमेरिकेला जायला निघाले तेव्हा त्याना वडिलाची आठवण येते त्या आठवणीने त्यानी रात्रीच्या अंधारात मनसोक्त रडून घेतले. होते आपल्या बापाने आपल्या शिक्षणासाठी किती कष्ट सोसले याची जाणिव त्याना होती आपण घेत असलेल्या शिक्षणाची कौतुक करायला वडिल नसल्यामुळे ते व्याकुळ झाले होते.

भीमरावानी अमेरिकेला जाण्यासाठी बोटीत पाय ठेवताना नमस्कार केला आणि मनात म्हणाले,

" तुम्ही दिलेल्या स्वप्नामागे मी धावत राहीन, स्वप्न दमेल पण मी दमणार नाही मी विजयी ग्रंथ लिहिन" [१२]

भीमराव बोटीत बसले तेव्हा रमाबाई रडत होती. तिला काही सुचत नव्हते. त्यावेळच्या तिच्या आसवातलं सुख आणि दुःख कोणीही वेगळे केले नसते अशी ती रडत होती. बोट मुंबई बंदरातून सुटली तेव्हा तिच काळीज थरारल होतं.

न्युयॉर्कच्या कोलंबिया विद्यापीठात भीमरावांचे आयुष्य झेपावून गेले होते. त्यानी रमाबाईला कोलंबियातून पहिल पत्र पाठवलं होते. तिच्या आयुष्यात तिला आलेले हे पहिल पत्र होतं. तीच्या आनंदाला पारावार नव्हता. भीमरावानी पत्रात लिहिल होतं.

" मी सुखरुप पोहचलो चिंता नसावी मला अमेरिकेत शिक्षण घ्यायला येण्याची जी संधी मिळाली तिचे आपण आभार मानले

पाहिजेत ही गोष्ट कदाचित नवा इतिहास जन्माला घालणारी ठरेल. बोट सुरु होताना तुझ्या डोळ्यातील आसवं पाहिली मलाही थोडं गलबजून आलं होतं. पण रमा हे विरह आणि ही दुःख आपल्याला मोठी करणारी आहेत.

रमा ! स्वतःला जप या वेड्या वाद्ळाच्या पाठीशी उभी रहा यशवंतला जप, त्याची प्रकृती बरी नसते. काळजी वाटते सांभाळ त्याला ."[13]

भीमरावाचे आलेले पत्र वाचताना रमाबाईच्या एका डोळ्यात काळीज नाचत असते तर दुस-या डोळ्यात अश्रु असतात नव-याने आपल्याला शिकवल्याचे महत्व तिला कळते त्यामुळे तिला खूप आनंद झाला होता. या आनंदाच्या भरात तिने भीमरावाना पत्र लिहिलं.

" आपलं पत्र आल ते वाचलं खूप आनंद झाला. साहेब आमची काळजी करु नका आम्ही सारे खुशाल आहोत, मी सांभाळते सगळं.

आपल पत्र पोयबावडीतल्या शेजा-या पाजा-यानी वाचल सगळयाना खूप आनंद झाला. कष्टाची मला चिंता नाही. माझ आपल्याशी लग्न झाल त्याचा मला खूप गौरव वाटतो. आपण खूप शिकाव हीच माझी कामना आहे. आपण पत्रात अनेक गोष्टी लिहिल्या मी तुमच्या पाठीशी उभी राहिन. काय वाटेल ते कष्ट करीन पण पाठीशी उभी राहीन काय वाटेल ते कष्ट करीन पण मागं हटणार नाही याची आपण खात्री बाळगावी.

आम्ही सर्व खुशाल आहोत असं समजा आपण जेवणवेळच्या वेळी ह्या तब्येतीची काळजी घ्या. यशवंतला आपले पत्र वाचून दाखविलं बाबा कधी येणार असं तो पुन्हा पुन्हा विचारतो.

पत्र पाठवून खुशाली कळवावी

धांबते ."[14]

रमाबाईनं पत्र पूर्ण करुन टाकायला गेलो तेव्हा तिच्या पापण्या ओल्या झाल्या होत्या.

भीमराव अमेरिकेला गेल्यापासून रमाबाईला खूप हालअपेष्टा सोसाव्या लागत होत्या. त्यातच तिच्या पोटी जन्माला आलेला मुलगा मरण पावला होता त्याचं नाव रमेश होतं. वर्षाच्या आतच तो मरण पावला होता. नवरा नसताना तिचा मुलगा मरण पावला होता. त्यामुळे तिनं पत्र लिहून नव-याला कळवलं.

" अत्यंत दु:खाची बातमी आहे. रमेश आपल्याला सोडून गेला. त्याच्या आजाराचं मुद्दाम कळवलं नव्हतं तुमच्या अभ्यासात तुम्हाला दखल देऊ नये. एवढयासाठी तुम्हाला कळवलं नाही. त्याची क्षमा मागते.

इतकं सगळ सोसते आहेच त्याऱ्हा आघात कुठून शक्ती आणावी ? पण तुम्हाला एवढीच विनंती की हे दु:ख तुम्ही माझ्यावर सोपवून द्या तुम्ही तुमच्या अभ्यासात अडथळा येऊ देवू नका.

यशवंतचा नमस्कार ".[१५]

हे पत्र वाचताना बाबासाहेबांचे डोळे भरुन आले आणि ते स्वत:शीच म्हणाले " अरे या बापाला न भेटताच निघून गेलास बाळा ! एवढेच बोलले आणि त्यानी रडवलेल्या अवस्थेत आपल्या पत्नीला पत्र पाठवून धिर देण्याचा प्रयत्न केला. पण रमाच्या काळजाला पडलेला खड्डा त्यामुळे बुजणं शक्य नव्हते.

भीमराव अमेरिकेहून १९१७ मध्ये परत मुंबईला आले होते. त्यामुळे रमाबाईला थोडं बरं वाटले. त्यावर्षीच भीमरावांची सावत्रआई जिजाबाई मरण पावते. पाठोपाठ एक वर्षानंतर भीमरावांचे वडिल भाऊ आनंदराव मरण पावतात. आणि लगेचच काही दिवसानी आनंदरावांचा मुलगा गंगाधर बापाच्या पाठोपाठ मरण पावला.

अांबेडकर कुटुंबांची अशी मोडतोड झाली होती. मरणानी जणू त्यांच्यावर आघातच केला होता. मात्र त्यावेळी एक गोष्ट चांगली घडली होती. भीमरावाना सिडनहॅम कॉलेजमध्ये प्राध्यापकाची नोकरी मिळते. त्या नोकरीचा पगार त्याना साडेचारशे रुपये मिळत होता आणि त्यामुळे रमाबाईला खूप आनंद झाला होता आणि तिला वाटत होत की आता आपला नवरा संसारात लक्ष घालेल. पण त्यांच्या भविष्यकाळाने वेगळेच ठरविले होते.

भीमराव अमेरिकेहून घरि आल्यानंतरचे वर्णन युगप्रवर्तक मध्ये असे दिसते.

साहेब अमेरिकेहून मुंबइला पहाटे येतात आणि ते घरी जातात आणि दारातून यशवंत म्हणून हाक मारतात पण घरात सर्वजण झोपलेली असतात पणरमाबाईला अचानक जाग येते आणि ती दार उघडते आणि पहाते तर ती आश्चर्यचकीत होते समोर तिच्या साक्षात साहेब उभे होते तीच्या आनंदाला पारावार उरत नाही. तीला काय बोलावे हे सुचत नाही. ती फक्त साहेब म्हणाले आणि साहेबांच्या पायावर डोके ठेवते.

साहेब अमेरिकेहून परत आल्याची बातमी लोकाना समजते तशी त्याना भेटायला खूप गर्दी होते.

एक दिवस साहेब सकाळच्या वेळी काही लोकाबरोबर गप्पा मारीत बसले होते तेवढयात एक वृध्द गृहस्थ तेथे येतात. त्या वृध्द गृहस्थाला साहेबानी पाहिल्याबरोबर त्यांच्या पायावर डोके टेकतात. तव्हा ते वृध्द गृहस्थ चिरंजिव हो असा अशीर्वाद देतात. तेव्हा साहेब त्याना आपल्या खुर्चीवर बसवतात आणि तिथे असलेल्या लोकानी हे माझे आंबेडकर मास्तर अशी ओळख करुन देतात आणि नंतर ती सव मंडळी गप्पा मारीत बसतात.

आंबेडकर मास्तर जेव्हा जायला निघतात तेव्हा साहेब त्याना म्हणाले

" सर मी दोन पैसे मिळवायला सुरुवात केली नाही तरी पण

फुलना फुलाची पाकळी म्हणून तुम्हाला गुरु दक्षिणा द्यायची माझी इच्छा आहे " [१६]

अशी साहेबानी आंबेडकर मास्तरांच्या जवळ इच्छा व्यक्त केल्यानंतर मास्तर गुरुदक्षिणा नाकारतात आणि म्हणतात

" नको भिवा, तू जी अफाट विद्या संपादन केली आहेस तीच मला गुरुदक्षिणा मिळाली आहे या जगात तुझा नाव लौकिक व्हावा हीच माझी इच्छा आहे." [१७]

परंतु साहेबाना मास्तराना दक्षिणा देण्याची इच्छा असल्याने ती घेण्याची मास्तर कबूल करतात.

साहेबाना आपल्या मुलांच्या शिक्षणाकडे वेळ द्यायला सवड नव्हती. पण आता ते मुलांच्याकडे लक्ष देण्याचे ठरवितात आणि मुलांच्यासाठी दोन खुर्च्या , एक टेबल आणि एक मोठा दिवा आणतात आणि त्या मुलांचा अभ्यास करून घ्यायचा प्रयत्न करतात. साहेबाना मुलाना प्रेमळपणे शिकवणे जमत नसत. ते मुलांच्याकडून रागावून आणि दमदाटी देऊन अभ्यास करून घेत होते. त्यामुळे वडिलाच्या त्रासाने मुलं फिरायला जात असत. मुलानी फिरायला जाताना इस्त्रीचे कपडे घातले की ते मुलाना म्हणायचे.

" अरे मला विद्यार्थी दशेत कधी चांगला शर्ट मिळाला नाही मी जेव्हा कॉलेजात गेलो तेव्हा मला प्रथमच चपला मिळाल्या, आणि तुम्ही मराठी शाळेत जातानाच भट्टीचे कपडे आणि बुट घालता ! ठीक आहे. एवढं करूनही तुम्ही पास होऊन चांगल नाव कमवा तुमचे आजोबा सुभेदार होते पण सुभेदाराच्या मुलगा किती शिकला ते तुम्ही पहात आहातच आता तुम्ही किती शिकणार आहात हे मी पाहणार आहे ." [१८]

साहेबांची मुलं गोखले एज्युकेशन हायस्कूलमध्ये इंग्रजी शिकू लागली होती. साहेब त्यांच्या अभ्यासाची कधी कधी चौकशी करत होते. आणि लहर आली तर मुलांना शिकवित असत. त्यांचा यशवंत हा मुलगा सारखा आजारी असत. त्यामुळे तो दुसरीत पास होऊनही त्याश्कमी मार्क मिळाले. म्हणून साहेबांनी त्याला गुराला मारतात तसे बुटाच्या लाथांनी मारले होते.

भीमराव पुन्हा लंडनला जातात त्याचे रमाई मध्ये वर्णन आलेले आहे.

१९२० साली बॅरिस्टर ही पदवी मिळविण्यासाठी लंडनला जाण्याची तयारी करु लागले तेव्हा रमाबाई आणि बाबासाहेब यांच्यात कडाक्याचे भांडण झाले होते. त्यामुळे बाबासाहेब खूप चिडून रमाबाईवर संतापले होते पण शेवटी रमाबाईच विचार करते की साहेबांनी आपल्याला पत्रातून कळवलं होत की तू माझ्या पाठीशी उभी रहा म्हणून आणि ती मनाशी स्वदेच ठरवते की साहेबांना संसारात घ्यायचे नाही तर ते सांगतील तसे वागायचे कारण ती समजत होती. त्याच्या पलीकडे साहेबांची झेप होती म्हणून ती म्हणाले आपला नवरा म्हणजे एक तुफान आहे. ते एक विद्युत प्रवाह आहेत. म्हणून ती मनाशी ठरवते.

" आता आपण तुफानाची सावली व्हायचं ते तुफान आपल्याला नेईल तिकडे जायचे आपल्याला कितीही कष्ट पडोत आता फक्त तुफानाच्या विजयासाठी जगायच ."[१९]

रमाबाईनी असा निर्णय घेतल्यानंतर साहेबांना कधी त्रास दिला नाही. घरामध्ये दोन खोल्या होत्या एका खोलीत संसार होता. तर दुस-या खोलीत तिचा ज्ञानपूर्ण प्रखर होत होता.

१९२० साली साहेब लंडनला गेले आणि त्याचसुमारास जन्माला आलेला मुलगा गंगाधर आजारी पडतो रमाबाई गंगाधर आजारी असल्याचे साहेबांना पत्र पाठवून कळवते. साहेबही लंडनहून पत्र पाठवून रमाची क्षमा मागतात पण रमाबाईला वाटते हा संसार आहे त्यात नव-यानं कसली बायकोची क्षमा मागायची आपणच त्यांना समजून घेतल

नाही ती चूक झाली असे समजते.

साहेब लंडनला असतानाच गंगाधर मरण पावतो. रमाबाई मात्र पत्र पाठवून गंगाधर मरण पावल्याचे साहेबाना कळवते. साहेबानी पत्र वाचून रमाबाईचे सांत्वन केले होते. पण त्याचबरोबर साहेबाना आपल्या गैरहजेरीत मुलगा वारला याचे वाईट वाटते आणि त्याच्याही पेक्षा वाईट वाटते ते म्हणजे गंगाधरला औषधपाणी नीट न मिळाल्यामुळे तो वारला होता. कारण डॉक्टरांची मागील बाकी दिल्याशिवाय पुन्हा औषध दयायला तयार नव्हते त्यामुळे साहेबाना वाईट वाटले.

माणसाच्या जीवनात " गरिबी " ही वाईट गोष्ट आहे. गरिबी ही दु:खाच्या खाईतून माणसाला वर येऊ देत नाही. वरती येण्याचा प्रयत्न करणा-याला ती परत परत त्याच खाईत लोटते.

रमाबाईनी नव-याच्या गैरहजेरीत आपल्या जावेला आणि तिच्या मुलाना कधी अंतर दिलं नव्हतं. एक लुगड परत परत नेसून दिवस काढीत होती. काटकसरीणे संसार करत होती. ती आपल्या नव-याला मोठ यश लाभाव म्हणून दर शनिवारी आणि पौर्णिमेला उपावास करत असत. तीला वेळेवर जेवण नसत. गरिबी फार होती ती एकेक वेळेला उडदाची डाळ खाऊन आणि पाणी पिऊन दिवस काढीत होती. कधी कधी तिला घरात काही नसल्यामुळे उपाशी रहावे लागत होत. पण हा संसार मोडू नये म्हणून ती जळत होती. तीनं शेण आणि गोव-या वेचल्या. सरपणासाठी दोन दोन कोस वणवण फिरत होती पण हे करीत असताना आपल्या नव-याच्या नावाला कमीपणा येऊ नये म्हणून ती सरपण वगैरे अंधार पडल्यावर रात्री आठ, नऊ वाजता घेऊन येत असत. पण हे करत असताना तीला काही बायका चिडवत असत. आमचे नवरे चांगले आहेत आमच्या अंगावर सोनं नाणं आहे. काय करायच शिक्षण नवरा बॅरिस्टर व्हायला जातो आणि बायको शेण वेचते

तिच्याबरोबर जाणाऱ्या बायका तिला असे बोलत असत. पण रमाबाई त्याना कधी उलट बोलली नाही ती सर्व बोलणे सहन करीत उलट त्याचा तिला आनंद वाटत होता.

रमाबाई दारिद्र्यात जळली. पण तीन कोणाकडे पदर पसरला नाही. तीला साहेबांची आठवण आली की ती रडत बसे पण तीचा एक वेगळाच दागिना घडत होता. युगप्रवर्तक दागिना, तीने साहेबाना आपल्या अंगावर दागिना नाही म्हणून पत्रान कळविले होते तेव्हा भीमरावानी रमाबाईला पत्र लिहून कळवल.

" रामु कोणालाही मिळाला नसेल असा दागिना कदाचित तुला मिळेल । अशा कोटयावधी लोकांच्या गळयातला तूच एक दिवस दागिना होशील.

" रामु । माणसाला दुःख मोठी करतात
सुख माणसाला मोठी करीत नाहीत.

ज्याना मोठ व्हायचं असतं ते लोक दुःखाचे आभार मानतात. रमा या दुःखाचे तू आभार मान ही दुःख तुला उजेडात घेऊन जातील"[२०]

साहेब लंडनहून आल्यानंतर संसाराकडे कसे लक्ष देतात ते युगप्रवर्तक मध्ये असे दिसते.

साहेब लंडनहून आल्यानंतर त्यांचे कौटूंबिक जीवन खारट तुरट आणि गोड अनुभव घेत जात होते. त्यातच त्याना मुलगा होतो ते मुलग्याचे नाव राजरत्न ठेवतात. राजरत्न हा मुलगा साहेबासारखाच होता. राजरत्नाच्या हाताचे पंजे आणि पायाची बोटे साहेबांच्या सारखेच होती.

साहेबांची कौटूंबीक स्थिती आता थोडीफार सुधारली होती. त्यामुळे लहान राजरत्नाच्या निगेसाठी ते एक नर्स ठेवायचे ठरवितात. पण त्यावेळी महारांच्या घरातहिंदू नर्स काम करायला तयार नव्हत्या, नंतर त्याना एक ख्रिस्ती नर्स मिळते ती आठवड्यातून दोन वेळेला रमाबाईला आणि राजरत्नाला औषधपाणी देऊन जात असे.

साहेबांचा राजरत्नावर फार जीव जडला होता. ते ऑफिस-

तून घरी आले म्हणजे त्याला अंगावर घेऊन खेळवत असत राजरत्नामुळे साहेब संसारात रमत होते त्यामुळे रमाबाईलाही आनंद वाटत होता.

यशवंत आणि राजरत्न ही दोन्ही मुले अधून मधून आजारी पडत तेव्हा साहेब स्वत:हून त्यांच्या औषध पाण्याची व्यवस्था करीत असत. राजरत्नाला थोडा जरी ताप आला तरी शेजारच्या बायका रमाला गावठी उपाय सांगत ते सर्व रमाबाई करीत असत. राजरत्न दिड दोन वर्षाचा होईपर्यंत त्याच्या गळयात आणि दंडाला अनेक ताईत, आणि दोरे बांधले होते. इतके करुनही एक दिवस राजरत्नाला फणफणून ताप येतो त्यातच त्याला डबल न्युमोनिया होतो. त्यामुळे साहेब रमाबाई, लक्ष्मीबाई आणि शंकरराव हे रात्रभर जागतात पण ताप कमी येत नव्हता.

दुस-या दिवशी राजरत्नाचा ताप थोडासा उतरतो हे पाहून साहेबाना बरे वाटते तेव्हा ते अकरा वाजता कोर्टात जातात. परंतू साहेब कोर्टात गेल्यावर राजरत्नाचा ताप पुन्हा वाढतो. रमाबाई घाबरतात आणि त्यांनी लगेच शंकरदादाला कोर्टात साहेबाना बोलवायला पाठविले पण साहेब कोर्टातून घरी येण्यापूर्वीच राजारत्न हे जग सोडून जातो.

साहेबानी घरी येऊन घरातील वातावरण पाहताच हंबरडा फोडला होता ते भिंतीवर डोके आपटून मोठयाने रडत होते. साहेब रडल्याले ऐकून शेजारची माणसे येऊन त्यांचे सांत्वन करीत होती

राजरत्नावर स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करुन सर्व लोक परत येतात. तेव्हा साहेबांचा चेहरारडून लाल झाला होता. ते पाहून साहेबांचा मित्र साहेबाना म्हणाला होता.

" अरे, आम्ही तुला उपदेश करावा, की तु आम्हाला उपदेश करावास ? आमच्या डोईवर जेवढे केस आहेत, त्याच्या लाखोपट तुझ्या मनात विचार आहेत. आम्ही तुला काय सांगायचे ? गप्प रहा आता ?

हा मित्रानी साहेबाना केलेला उपदेश ऐकून साहेब मित्राला म्हणाले

" माझी तीन मुलं आणि एक मुलगी अशी एकूण चार गोजिर-वाणी सुंदर, भाग्यवंत आणि वंशाला भूषणभूत होतील अशी मुल जमिनीत गाडून आम्ही नवरा बायकोने आतापयत संसार केला. राज-रत्नाच्या मृत्यूने नियतीने आमच्यावर वज्राघात केला आहे. राजरत्न गेला आणि आमच्या आयुष्याचे जीवनाचे सहारा वाळवंट झाले. आमची मुलं परमेश्वराच्या दरबारात गेली. पण आमची जीवन ज्योत मालवली गेली. आता सर्वत्र अंधार आहे. आमचं दुःख आम्ही विसरु शकत नाही आकाशात एकापाठोपाठ एक ढेग येतात, तसेच दिवस येत असतात. हेच दिवस आता कसेबसे ढकलायचे आहेत ".[२२]

साहेब मित्राला सांगत असताना रमाबाई रडत होत्या या उत्तराने साहेब आपल्या जीवनात मुलांच्या बाबतीत अपयशी झाल्याचे दिसतात. विशेषत: बाबासाहेबांच्या मुलांचे जीवन रमाईपेक्षा अधिक विस्ताराने युगप्रवर्तक मध्ये आलेले आहे.

लंडनहून साहेब आल्यानंतरचे चित्र रमाई मध्ये असे दिसते.

१९२३ साली साहेब लंडनहून आल्यानंतर ते संसारात रमू लागले होते. पण १९२६ मध्ये नियतीने त्यांच्यावर पुन्हा एकदा आघात केला होता. त्यांचा राजरत्न हा जन्माला आलेला शेवटचा मुलगा मरण पावला हा साहेबांचा लाडका मुलगा. तो खूप देखणा होता. तो त्यांना जीव की प्राण वाटे.

अशा अनंत मरणानी रमाबाईला आणि साहेबाना हवालदिल केलं होते. रमाबाईची तरी विज पडून झाड कोसळाव अशी : अवस्था झाली होती.

रमाबाई आणि साहेब याना पाच मुले झाली होती. त्यापैकी चार अगदी लहानपणी काळाच्या पडधाआड गेली होती. फक्त यशवंत

तेवढाच जगला होता. त्यामुळे मुलांच्या मरणानी दोघेही नवरा बायको हादरुन गेली होती. त्याना दु:ख असह्य झाले होतं पण या दु:खातून रमाबाईच स्वत:ला सावरते आणि साहेबाना म्हणते.

" दु:ख करायला जे थांबतात ती जीवनात काही करु शकत नसतात. तुम्ही या दु:खातून बाहेर पडाव यातच हित आहे ".[२३]

रमाबाई सांगत होत्या पण साहेबाचे मन मानायला तयार नव्हते. परंतू रमाबाई सांगत होती ते खरं होत. कारण संन्यस्त जीवनाकडे झुकू लागलेल्या साहेबांची गरज सा-या समाजाला होती आणि साहेबांनी थांबायला नको होतं हेही खरे होते.

यावरुन रमाबाईचा सोशिकपणा, तिच्या मनाचा मोठेपणा हा रमाईतून वरील प्रसंगावरुन दिसून येतो.

" मुलांच्या मृत्यूने बाबासाहेब खचले असले तरी ते रमाबाईच्या सांगण्यावरुन समाजकार्याकडे वळतात. समाजकार्यातूनच ते १९३० साली गोलमेज परिषदेला लंडनला जाण्याच्या तयारीत असतात त्याचवेळी रमाईची प्रकृती ढासळली होती तरी सुध्दा या देशातील कोटयावधींची गुलामी नष्ट व्हावी म्हणून साहेब स्वत:चा जीव धोक्यात घालत होते. त्यामुळे रमाबाईला साहेबांची सारखी काळजी वाटायची ते पाहून बाबासाहेब रमाबाईवर रागवत असत आणि स्वत:ची काळजी घेण्यास सांगत.

बाबासाहेब लंडनला जायला निघाले तेव्हा त्याना निरोप द्यायला वराळे हे धारवाडच्या वसतिगृहाचे प्रमुख आणि रमाबाई आल्या होत्या साहेब लंडनला गेले तेव्हा वराळे रमाबाईला धारवाडला नेणेस सांगतात आणि साहेब लंडनला जातात आणि रमाबाई वराळे बरोबर धारवाडला जाते. तिथे तिची तब्येत सुधारते आणि तिला बरे वाटू लागते.

एके दिवशी ती विद्यार्थी वसतिगृहाकडे फिरत जाते पण तिथे तिला वेगळेच वातावरण दिसते. तेथील मुले उपवाशी असतात. वसतिगृहातील जेवणाचे साहित्य संपलेले असल्यामुळे आणि वाणि पहिली बाकी तटल्यामुळे उदार देत नव्हता. तेव्हा रमाबाईनी आपल्या स्वत:च्या हातातील सोन्याच्या बांगडया गहान ठेवून त्यांचे जेवणाचे साहित्य आणले आणि मुलाना स्वत: जेवण करुन वाढले.

बाबासाहेबांचे गोबमेज परिषदेतील वर्णन युगप्रवतक मध्ये असे दिसते.

साहेब समाज कार्य करीत होते त्यांच्या जोडीला समाजकार्य करण्यास संभाजी गायकवाड हे होते. पण ते दारुडे होते आणि संभाजी गायकवाड बरोबर साहेब समाजकार्य करु लागले म्हणजे साहेबांच्या भावाना राग यायचा चिडून ते रमाबाईला म्हणायचे.

" वैनि या साहेबाना अक्कल कशी नाही ? सकाळ पासून ते रात्रीपर्यंत दारात लोळणा-या त्या सामाजिक कार्यकर्ता संभाजी गायकवाडचा मोह साहेबाला का पडला आहे ? तो सामाजिक कार्यकर्ता आहे. हे मला मान्य आहे पण त्याचे इतर दुर्गुण पाहिले म्हणजे त्याच्याजवळ उभं सुध्दा रहावत नाही अशा टोळभैरवांच्या संगतीने का साहेब समाजकार्य करणार आहे ".[२४]

रमाबाईला तिच्या भावोजींचे बोलणे पटत होते पण तीला वाटे की भावोजीनी साहेबाना सांगावे, रमाबाई सौख्याच्या शिखरावर होती. तिला अधूनमधून मरण पावलेल्या मुलांची आठवण येत असत. साहेबाना आपल्या मुलानी खूप शिकावं असं वाटत होतं. पण ते घडत नव्हते. कारण जसे घोडयाला पाणी पिण्यासाठी नेणारा माणूस जसा घोडयाला पाणी पाजू शकत नाही तसंच शेवटी साहेबांचे त्यांच्या मुलांच्या बाबतीत झाले.

दापोलीला असताना रमाबाइची आई तिला म्हणाली होती " रमा तू मोठी भाग्यवान आहेस म्हणून रमाबईच्या आईच्या तोंडून सहजपणे बाहेर पडलेले उद्गार रमाबाईच्या जीवनाचा विचार केल्यास सार्थ ठरतात. म्हणूनच स्त्रीचे जीवन म्हणजे पतीच्या चरणावर भक्तिभावाने आणि आदराने समर्पित केलेले एक कमलपुष्पच असते. रमाबाईला साहेबांची काळजी जास्तच वाटायची अमावस्येनंतरच्या कलेकलेप्रमाणे वाढणा-या चंद्राप्रमाणे साहेबांचे तेज वाढत होते. त्यांचे गोलमेज परिषदेतील कामगिरीबद्दल सरकार दरबारी वजन पडू लागले होते. समाजात मान मिळत होता. पण रमाबाई जास्तच आजारी पडत होती. साहेब रमाबाईला भेटायला येत तेव्हा रमाबाईकडे पाहून ते जडअंत:करणाने नि:श्वास टाकीत असत ते रमाबाईला पहावत नसत. तेव्हा ती देवाला आपल्याला लवकर मुक्त कर असे म्हणत असत.

रमाबाई आपल्या साहेबाना यश लाभावं म्हणून देवावर किती विश्वास ठेवत होत्या हे रमाईमध्ये असे दिसते.

रमाबाईचा देवावर विश्वास होता. ती नव-यासाठी उपवास करत आणि नव-याला काही धोका येऊ नये म्हणून देवाला नवस बोलत असे.

रमाबाईचा हा देवावरील विश्वास पाहून साहेब तीला जवळ बसवून घेत आणि देवधर्म हे सर्व खोटे आहेत. असे सांगत असत. रमाबाईला ते पटत होते पण तिच्या मनातील संस्कार जात नव्हते ती चोरुन देवाची पूजा करायची साहेबाना दिसणार नाही अशा ठिकाणी देव लपवून ठेवायची असे संस्कार तिच्यावर वरचढ ठरत होते.

रमाबाईन पंढरपूरबद्दल बरच ऐकलं होतं. पांडुरंग हा भक्ताचे लळे पुरविणारा देव आहे. अशी तिची श्रध्दा होती. तिला चोखोबाबद्दल ऐकून माहिती होतं. चोखोबाच्या नायकाचे बाळंतपण विठोबाला केल. जनाईचे दळणकांडण केलं होतं. या सर्व कथा तिच्या कानावर

आल्या होत्या. त्यामुळे ती मनातल्या मनात पंढरपूरला जावं असं ठरविते. आणि आपला बेत साहेबाना पसंत पडणार नाही हे ती जाणून होती तरी पण विचारुन बघावे म्हणून ती साहेबाना पंढरपूरला जाण्याबद्दल घाबरत घाबरत विचारते ते साहेब ऐकून घेतात आणि एकदम कडाडतात आणि म्हणतात.

" खालच्या जातीच्या लोकाना पांडुरंग दर्शन देत नाही. सातशे वर्षापूर्वी चोखोबालाही घेता आल नाही जो देव भक्ताना दर्शन देत नाही त्या देवाकडे कशाला जायचं आपण ? जो देव पंडयाचच ऐकतो आणि प्रांजळ भक्ताना जवळ येऊ देत नाही तो देव काय कामाचा ? काय करायचं त्या पंढरपूरचं ? "[२५]

हे साहेबांचे बोलणे ऐकून रमाबाई म्हणते तुम्ही देव मानत नाही तर नाशिकला काळाराम मंदिराचा सत्याग्रह का केला. तेव्हा साहेब रमाबाईला सांगत होते की नाशिकचा सत्याग्रह हा देवासाठी नव्हता तर तो समतेच्या हक्कासाठी होता आणि आपण जर हिंदू आहोत तर हिंदूना मिळणारे हक्क आपल्याला का मिळत नाहीत. त्यासाठी तो लढा होता असे सांगतात.

साहेबांचे हे बोलणे ऐकून रमाबाई पुन्हा आपले मत पुढे करते आणि म्हणते चोखोबाने जसे दुरुन दर्शन घेतले तसे मीही घेईन पण साहेब पुन्हा चिडून पंढरपूरला जाणेस नकार देतात. तेव्हा रमाबाई रडवेली झाली होती. रमाबाई रडवेली झालेली पाहून साहेब तीची समजावणी काढून सांगत होती की आपण आपल्या त्यागातुन गोरगरिबांच्या सेवेन दुसरं परिवर्तनाचं पंढरपूर निर्माण करु तिथे लोक भक्तीसाठी न येता क्रांतीसाठी येतील.

साहेबांचे बोलणे ऐकून रमाबाई पंढरपूरला जाण्याचा निर्णय सोडून देते ते पाहून साहेबाना खूप आनंद होतो.

रमाबाईचा देवावर विश्वास होता हे चित्र युगप्रवतक मध्ये कमी प्रमाणात दिसते.

बाबासाहेबांच्या जीवनात मृत्यूनी पाठलागच केला होता. त्यानी स्वत:च्या हातानी आपल्या सोन्यासारख्या चार लहान मुलाना स्वत:च्या उघड्या डोळ्यानी माती दिली होती त्या दु:खातून सावरुन ते आता सामाजकार्यात गुंतले होते आणि त्याना समाजकार्यात यशही मिळत होते. आणि हे समाजकार्य करत असताना त्यांच्या आयुष्यात आणखी एक आघात होतो आणि तो म्हणजे त्यांची धर्म पत्नी रमाबाई त्याना या जगातून सोडून जाते त्याचे वर्णन युगप्रवर्तक मध्ये असे दिसते.

बाबासाहेबांच्या घरात राजरत्नाच्या मृत्यूनंतर बरेच दिवस कोणाचा मृत्यू झालेला नव्हता. त्यामुळे ते सुखी होते. पण अचानक त्यांच्या घरात एक दिवस मृत्यूने प्रवेश केला होता. त्या मृत्यूची त्याना अस्पष्ट अशी जाणीव सुध्दा नव्हती. तो मृत्यू साहेबांच्या घरात येताना एकटा आला होता आणि घरातून जाताना मात्र त्यांची पत्नी रमाबाईचे प्राण घेऊन गेला होता या प्रसंगी साहेब स्वत:च म्हणतात.

" माझ्या सहका-या समवेत मी मुग्धपणे उभा होतो. काहीही सुचत नव्हतं मला. मस्तकात अनेक विचारांचे कल्लोळ निर्माण झाले होते. माझ्या जन्माची सहचारिणी रमा माझ्यासमोर शांतपणे झोपली होती. यापुढे तिची कधीही झोपमोड होणार नव्हती. माझे सहकारी नातलग रमाच्या अखेरच्या प्रवासाची तयारी करत होते. यशवंत ढसाढसा रडत होता. मला त्याच्याकडे पहावत नव्हतं. त्याच्याकडेच काय मला कुणाकडेही पहावतं नव्हतं माझी दृष्टी रमाच्या चेह-यावर स्थिर झाली होती.

रमाच्या एकूण एक गुणाची उजळणी होत होती. यशवंतची काकू एकापाठोपाठ एक रमाच्या आठवणी काढून आक्रोश करीत होती. मुकूंदा काकु काकु असा मारख्या हाका मारीत रडत होता. मुकूंदच्या लहान बहिणीने " काकी आम्हाला सोडून जाऊ नकोस, " असा भीषण हृदय हेलावून सोडणारा टाहो फोडला होता"

बाबासाहेब आंबेडकर हे दलित समाजाचे राजे होते. पण त्यांची पत्नी रमाबाई ही त्यांची राणी म्हणून कधीच राहिली नव्हती. कारण तीने साहेबांच्याकडे कसलाच हट्ट धरला नव्हता. असेल त्या परिस्थितीत तिने दिवसकाढले होते. जाडयाभरडया वस्त्रात तीने दिवस काढले होते कधी दागिन्यासाठी हट्ट धरला नव्हता. असेल त्या परिस्थितीत तिने दिवस काढले होते. जाडयाभरडया वस्त्रात तिने दिवस काढले होते कधी दागिन्यासाठी हट्ट धरला नव्हता स्वढे असूनही रमाबाईनी फक्त साहेबांची काळजी घेतली होती.

रमाबाईच्या अंत्यविधीची तयारी धायविलकर बुवानी केली होती. उपशाम, मडकेबुवा, दोंदे, डोळस, वाघमारे, पगारे, इत्यादी कार्यकर्ते साहेबांचे सांत्वन करत होते. राजगृहाबाहेर हजारो लोक जमले होते. तेही साहेबांचे सांत्वन करत होते.

रमाबाईच्या मृत्यूची बातमी वर्तमानपत्रात पहिल्याच पानावर छापून आली होती. आकाशवाणी वरुनही तिच्या मृत्यूची बातमी देण्यात आली होती.

बाबासाहेब कधी बॅ. सावरकर, म. गांधी यांना घाबरले नाहीत. कधी समाजात वावरताना आलेल्या प्रसंगाला घाबरले नव्हते. पण स्वत:च्या पत्नीचा मृत्यू समोरुन नेताना ते घाबरले होते.

रमाबाईची अंत्ययात्रा राजगृहावरुन निघाली हजारो लोक सामील झाले होते. हजारो पुष्पचक्र रमाबाईच्या देहावर अर्पण करण्यात आली होती. शेवटी रमाबाईची अंत्ययात्रा दादरच्या चौपाटीवर पोचली आणि तिथेच त्या चौपाटीवर रमाबाईवर हिंदू पध्दतीने अंत्य-संस्कार पार पाडण्यात आले.

सारा दलित समाज आणि अंत्यसंस्कार करण्यास आलेले सर्व लोक मुकपणे माघारी फिरले होते मात्र सिंहासारखे गर्जना करणारे बाबासाहेब आपल्या प्रिय पत्नीच्या विरहामुळे स्फुंदून स्फुदुन रडत होते. त्यांच्याच जोडीला दोंदे मास्तर साहेबांच्या खांद्यावर हात ठेऊन आपला आणि साहेबाचाही शोक आवरत होते.

रमाबाईच्या मृत्यूचे चित्र रमाइ या कादंबरीत असे दिसते.

रमाबाईने आपला संसार सांभाळण्यासाठी खूप हालअपेष्टा सोसल्या होत्या. तरी सुध्दा ती कधी स्वत:च्या मृत्यूला घाबरली नाही. मात्र साहेबांच्या जीवाला काही धोका होईल म्हणून ती घाबरत होती. बाबासाहेबानाही माहित होते की आपण आपल्या पत्नीला कधी सुख दिले नाही. तिला नेहमी दु:खच मिळाले होते आणि रमाबाईच्या भरोशावर ते संसार सोडून ज्ञानाच्या अंतराळात भरा-या मारत होते. त्यामुळे साहेबाना वाटत होते की रमाबाईच जे आपल्यावर कर्ज आहे ते आपण रमाबाईला काहीही केलं तरी फिटणार नाही.

रमाबाईने साहेबांच्या बरोबर संसार केला होता . तिला सुखापेक्षा दु:खच जास्त मिळाले होते. तरी सुध्दा ती आनंदात होती. आयुष्यांच्या शेवटाकडे ती झुकली होती तेव्हा ती म्हणायची.

" आता माझी एकच अपेक्षा. भरल्या कपाळान आणि हिरव्या लुगडयात जायला मिळावं " २७

रमाबाई असे बोलायला लागली की साहेब कळवळून जात आणि म्हणात -

" रमा, जिथून जगायला प्रारंभ करायचा तिथून तू मरणाची भाषा बोलते आहेस.

जिथून प्रकाशायचं तिथून तू विझण्याची भाषा करते आहेस. तुझा माझा दिवस आता कुठे उगवला आहे रमा आता तर रंगभूमीचा पडदा उघडला आहे आणि तू !

तू पडद्याआड जाण्याची भाषा करते आहेस !

तू जाऊ नकोस रमा ! तू गेलीस की माझ्यातलंच मोडून जाईल " २८

रमाबाईला साहेबांचे बोलणे पटत होते पण तिला बाबासाहेबांचा सुर्य वर चढताना दिसत होता. पण तिचा चंद्र निस्तेज होता. सुर्याच्या गैरहजेरीत चंद्राची उजेड देण्याची भूमिका असते पण चंद्राची भूमिका संपत आली होती.

१९३४ साली शेवटचे काही दिवस उरले असताना बाबासाहेब वेरूळला गेले होते. ते चार दिवसांनी परत आले तेव्हा रमाबाई अंथरुणाला खिळली होती तिच्या आयुष्याभोवेती मृत्यूची एकेक सावली उतरत होती.

रमाबाईचा आजार वाढत होता. त्यामुळे साहेबानी नामवंत डॉक्टराना आणून तिच्यावर औषध उपचार चालू केले होते. त्यामुळे बाबासाहेब मुंबईपासून जवळच असलेल्या पनवेलला मुलांचे वसतिगृह स्थापन करण्यासाठी गेले होते. पण तोपर्यंत इकडे रमाबाईच्या जीवनाभोवती क्षय रोगानं पाश आवळला होता. १९३५ च्या मे महिन्याच्या शेवटी रमाबाईचा आजार खूप विकोपाला गेला होता. तेव्हा बाबासाहेबाना पनवेलला तातडीचा निरोप पाठविला जातो ते तावडतोब घरी येतात. ते त्यांचे कुटूंब त्यावेळी राजगृह या त्यांच्या स्वत:च्या इमारतीत रहात होते. घरी आल्यानंतर डॉक्टरला रमा कोणत्याही परिस्थितीत जगली पाहिजे असे सांगतात.

बाबासाहेब घरात येऊन रमाबाईला पाहतात तर तीथे लोक जमले होते ते जाऊन रमाबाई जवळ बसतात. पण त्यांची जीवनाची साथीदार आता शेवटच्या प्रवासाला प्रारंभ करीत होती. जगाचा शेवटचा निरोप घेण्याचा क्षण तिच्या जवळजवळ सरकत होता.

रमाबाईला शेवटच्या टप्प्यात बाबासाहेबांच्या बरोबर खूप बोलावं अस वाटत होते. पण ती बोलू शकत नव्हती आपल्या आयुष्यात घडलेल्या घटना आठवून नव-याकडे पहात नजरेनच साहेबाना म्हणत होती.

" यशवंताची काळजी घ्या आता तेवढाच आपल्या काळजाचा गोळा उरला आहे. बाकी आपल्या काळजाचे सर्वच तुकडे आपण स्वत : उध्वस्त होत जमिनीत पुरले. आता आपल्या वंशाचा यशवंतच्या रुपान एकूलता एक दिवा उरला आहे आता तुम्हीच त्याची आई व्हा माझी उणीव त्याला भासू देऊ नका. त्याला आईची माया द्या[२९]

असं खूप काही साहेबाना सांगावं अस रमाबाईला वाटत होत. पण तिची जिभीच घायाळ पक्षाच्या पंखाप्रमाणे लुळी पडली होती. तरीसुध्दा ती- नजर बाबासाहेबाना सांगत होती की साहेब तुम्ही रडत बसू नका. या देशातील सारी बेवारस दुःख तुमची वाट पहात असेल. त्यांची आसव या तुमच्या क्रांतिकारानी पुसा असे सांगता सांगता ति आणखी पुढे नजरेच साहेबाना म्हणत होती.

" तुम्ही माझे पति आहात, या एका सुखापुढे माझी हजार दुःख पार मरून गेली आहेत. कोणीच कोणाला देऊ शकणार नाही ते तुम्ही मला दिलं. तुमच्यासाठी मी काही छोटी दुःख भोगली पण आता त्यांचाही केवढा गौरव वाढतो असा दुःखाचे अलंकार युगायुगातून एखाद्याच स्त्रीच्या वाट्याला येतात साहेब । मलाही दुःख देऊन माझ्यावर केवढे उपकार केले तुम्ही । कृतज्ञता तरी कशी व्यक्त करु ".[30]

असे रमाबाईला साहेबांच्या बरोबर खूप बोलाव असं वाटत होतं. पण ती बोलू शकत नव्हती.

बाबासाहेब तिला जवळ बसून मोसंबीचा रस पाजत होते. चहा पाजत होते. साहेब हे एक महापुरुष होते ते आपल्या पत्नीची अखेरची सेवा करीत होते. आणि म्हणत होते. तुला जगलं पाहिजे माझ्यासाठी आणि यशवंतसाठी पण काळ आणि वेळ कुणासाठी थांबत नसते.

रमाबाई आता शेवटचा निरोप घेण्यास सिध्द झाली होती. त्यामुळे अंगणात लोकांची खूप गर्दी जमली होती. तरीपण साहेब रमाबाईला म्हणत होते.

" मला सोडून जाऊ नको रमा अजून खूप मनापर्यंत उजेड न्यायचा आहे. असंख्य घरामध्ये प्रकाश पेरायचा आहे हा समाज आणि हा देश प्रकाशात उभा करण्यासाठी तुझी साथ हवी आहे रमा, रमा तू मरु नको ".[31]

असे साहेब रमाबाई बरोबर बोलत असताना साहेबांच्या डोळ्यातून

अश्रू वाहत होते ते अश्रू पुसण्यासाठी रमाबाईन आपला हात वर उचलण्याचा प्रयत्न केला पण तो हात त्या अश्रूपर्यंत गेलाच नाही.

२६ मे १९३५ रोजी रविवारचा दिवस होता तो त्या दिवशी सकाळी ९ वाजता एक करुणा शांत झाली होती. त्या करुणेच्या महाकाव्याची शेवटची ओळ इथे पूर्ण झाली होती. बाबासाहेबानी रामु रामु म्हणून हंबरडा फोडला होता. यशवंताने आई आई म्हणून शोक मांडला होता. त्याचं मातृछत्र फाटून गेल होतं. साहेब आपल्या पत्नीला आपण सुख दिले नाही म्हणून पुन्हापुन्हा रडत होते.

रमाबाईच्या अंत्यविधीची तयारी सुरु झाली तेव्हा साहेबानी तीला पांढर पातळ आवडते म्हणून पांढर पातळ नेसवायला सांगीतले पण सौभाग्यवतीला हिरवी चोळी आणि हिरव पातळ द्यायचं असतं. असे सांगीतल्यावर ते परवानगी देतात.

राजगृहापुढे चाळीस पन्नास हजार लोक रमाईच्या अंत्यसंस्कारासाठी जमले होते. दूपारी दोन वाजता प्रेतयात्रा निघते तेव्हा यशवंत हातात शिंकाळ घेऊन पुढं होता आणि वरळीच्या स्मशानभूमीवर तिच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले आणि एका महाकाव्याचा शेवट इथे होतो.

युगप्रवर्तक व रमाई या दोन कादंब-यातून बाबासाहेब आंबेडकर व त्यांची पत्नी रमाबाई यांचे जीवन चित्रीत झालेले आहे. तसे पाहिले तर बाबासाहेबा सारख्या उत्तुंग व्यक्तिमत्वाला साकार करणे हे कठीण काम यातूनही दोन्ही कादंब-यांच्या निर्मात्यानी हे काम सहजपणे पेललेले आहे. दोन्ही कादंब-यांचा साचा वेगळा आहे. युगप्रवर्तक ही आत्मनिवेद-नात्मक कादंबरी आहे. या कादंबरीकाराने अनेकांच्या अभिप्रायासह बाबासाहेबाना न्याय देण्याचा प्रयत्न केलेला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वत:च आत्मकथन करतात अशी या कादंबरीची सुरवात आहे. त्या त्या व्यक्तिने केलेले कथन त्यानी भाग म्हणून वापरलेले दिसते. हरिभाऊ पगारेने भाग एक, तीन आणि सहा हे ~~तीन~~ भाग बाबासाहेबांच्या निवेदनातून वापरलेले आहेत. म्हणजे जवळजवळ १५० पानापेक्षा अधिक पाने त्यानी बाबांच्या निवेदनाला दिली आहेत. आंबेडकरांच्या

पत्नी रमाबाई, श्री. मोरेश्वर दोंदे, भाऊराव गायकवाड, आर. डी. भंडारे, रेवाराम कवाडे, पी. एन. राजभोज, आचार्य अत्र्यांचे लेखन व शेवटी हरिभाऊ पगारे या इतराना त्यानी निवेदनात आव्हान केलेले दिसते.

" युगप्रवर्तक " कादंबरीत खरे म्हणजे अनेक व्यक्ती दुय्यम आहेत. आणि ते स्वाभाविक आहे. व्यक्तिचित्रण हा यातील हेतू फक्त बाबासाहेबांच्या पुरताच लेखकाने ठेवला असावा कारण घटना समस्या इतक्या विविध व जबरदस्त आहेत की त्यातून त्या त्या व्यक्तिचा पिळ उलगडला जातो. आंबेडकरांच्या जीवन प्रवासात अनेक दुःखाचे प्रसंग आलेत. अपमान व मानहानीतून त्यांच्या जिद्दी मनाला खतपाणी मिळत गेले. पंडित नेहरु, म. गांधी, या त्यांच्या काळातील प्रभावी व्यक्ती. लाला लजपतरायांची त्याना परदेशातील वास्तव्यात समाज-कार्याची प्रेरणा दिली. नेहरुना दक्षिण अफ्रीकेतील वर्णभेद दिसतो. पण भारतातील प्रत्येक खेड्यात दक्षिण अफ्रिका आहे ही विसंगती नष्ट नाही झाली तर विषमतेची आच ज्या दलिताना लागली ते दलितच या घटना समितीच्या परिश्रमाने बांधलेल्या राजकीय लोकशाहीचा हा मनोरा उध्वस्त केल्याशिवाय रहाणार नाहीत ही त्यांची व्यथा व भाकित पठ्ठेबापूरावने तमाशाचे चार खेळाचे देऊ केलेले उत्पन्न नाकारताना आंबेडकरांचा दृष्टिकोन फाळणी झाली. स्वातंत्र्य मिळाले रझाकारानी अनन्वित छळ केले अत्याचार केले. आंबेडकर पहिले कायदेमंत्री बनले. पण त्या जुलमात रक्तहिन क्रांतीचा पुरस्कार करणारे कुठे होते. पाकिस्तानच्या पदरात रक्कम टाकून तरुणांच्या मनातील फाळणीच्या जखमेवर मीठ चोळले गेले. गांधी देशाचा आणखी किती नाश करणार ? ही भावना प्रबळ झाली. नतुराम गोडसेने गांधीना गोळी घातली. इतक्या मोजक्या शब्दात आंबेडकर आपली प्रतिक्रिया नोंदिताना आढळतात. हे सर्व हरिभाऊ पगारे ओघवत्या भाषेत सांगतात हेच त्यांचे यश आहे.

कादंबरीच्या प्रस्तावनेत केशव मेश्राम म्हणतात,

" एका चरित्र नायक होण्याच्या पात्रतेच्या व्यक्तिवर त्याच्या जीवनातील वावटळीवर आणि त्याने स्वत:शी, स्वकियांशी आणि राजकीय हितशत्रुंशी दिलेल्या अविरत झुंजीवर कादंबरीचा साज चढविणे ही मोठी घटना आहे. सारी भाषा प्रांजल निवेदन प्रसंगाचा आव, स्थलकालाची बंदिशी, अनेक मतमतांतरे व सहकार्यासाठी पुढे सरसावलेल्या सवर्ण आणि जातीबांधवाना समजून घेण्याची वृत्ती या अनेक घटनानी श्री. हरिभाऊ पगारेनी लेखनात जिवंतपणा आणला आहे ".[32]

अनेकांच्या निवेदनामुळे कादंबरीचा आशय सलगपणे उलगडत जावा. असे या कादंबरीत होत नाही. एक प्रकारचा बांधणीतील सैलपणा आढळतो. कादंबरीकार अनेक ठिकाणी भावूक झालेला आढळतो. रुढ अर्थाने या लिखानाला कादंबरी म्हणता येईल का ? असाही प्रश्न निर्माण होतो. परंतु कादंबरी-काराची या निर्मितीमागे प्रामाणिक भूमिका लक्षात घेता दोषही अपरिहार्य ठरतात. कादंबरीकाराने आपली भूमिकाही स्पष्ट केलेली आहे ते म्हणतात.

" माझ्या जे काही वाचण्यात आले त्यांच्या साहाय्याने आणि विशेषत: मूकनायक, समता, बहिष्कृत भारत, जनता, प्रबुध्द भारत, धर्मध्वज इत्यादी साप्ताहिकाच्या आधाराने आणि बाबासाहेबांच्या सान्निध्यात राहून त्यांच्या चर्चेचा संभाषणाचा व्याख्यानाचा जो लाभ मिळाला त्यामुळेच मी लिहू शकलो. बाबासाहेबाचं जीवन जवळून पाहता आलं. त्यांच्या गप्पा गोष्टी अनुभवल्या. त्यांच्या प्रचंड बुध्दीमत्तेची गरुड झेप पहावयाला मिळाली. महाड नाशिक इत्यादी ठिकाणचे लढे त्यांच्या तोंडून ऐकायला मिळाले. घरगुती जीवन ऐकायला मिळाले. त्यांचे विविध अनुभव चाखायला मिळाले. या सर्व गोष्टींचा योग्य तो परिणाम कुणावर होणार नाही. रामायण महाभारत यातील कथा मी वाचल्या त्या कथा आवडल्या. अद्भुत म्हणून इ. स. पूर्वी 300 वर्षाच्या कथा खरोखरच कुणी पाहिल्या होत्या ? फक्त धार्मिक ग्रंथातून त्या वाचल्या हे धार्मिक ग्रंथ

लिहिणारे कोण ? त्या निर्मात्यांची माहिती आहे. त्यांचे जीवनही ग्रंथातून ऐकले आहे ते कशा प्रकारचे होते तेही माहित होते. एकूण ग्रंथ निर्मिती करणा-यापासूनच आम्हाला त्या ग्रंथाची माहिती आहे. आणि म्हणूनच आमचा विश्वास त्या ग्रंथावर नाही. ग्रंथकर्त्यांचे, जीवन स्वच्छ नाही. ज्यांच्या विषयी सांगीतलं गेले. त्यांच्यावर दैविक लेणं चढविलं या कथा म्हणजे इसापनितीतील गोष्टीच. कसा आमचा विश्वास बसावा ? हिंदू धर्मातील गोष्टीच. ग्रंथाबद्दल आम्हाला कशी गोडी वाटावी ? गोडी वाटण्याइतकं त्यात काही आमच्या उध्दाराचा मार्ग घालून दिला आहे काय ? महापराक्रमी कर्णाचा अपमान। एकलव्याचा कपटाने तोडून नेलेला आंगठा. शंबूकाचा श्रीरामाकडून वध, पाच भावाची पत्नी - पांचाली कुंतीला मंत्राच्या सामर्थ्याने झालेली पुत्रप्राप्ती या वा अनेक गोष्टी अद्भुत चमत्कारीक वाटतात. बाबासाहेब आंबेडकर ही व्यक्ती मला रामायण, महाभारतातील व्यक्तिपेक्षा श्रेष्ठ वाटली. कारण मी त्यांना जवळून पाहिलं होतं. जीवनाचे हळुवार शब्दात त्यांची जीवनगाथा ऐकली होती. जीवनातील अनेक शब्दात त्यांचे अनुभव ऐकले होते. म्हणून माझ्यासारख्या सामान्य माणसाची श्रध्दा, भक्ति, आदर जिव्हाळा, निर्माण होणे अपरिहार्य होतं.[33]

यावरुन लेखकाचा प्रामाणिकपणा स्पष्ट होतो. तसा कादंब-रीच्या मर्यादाही जाणवतात. एकूण बाबासाहेब आणि रमाबाई या दोघांच्या जीवनामध्ये बाबासाहेबाना अधिक प्राधान्य युगप्रवर्तकाने दिलेले दिसते.

याउलट रमाई या कादंबरीत यशवंत मनोहर यांनी बाबासाहेबाची प्रतिमा जितक्या सश्रध्दतेने उभी केली आहे. त्याहून अधिक उत्कट रमाईची प्रतिमा त्यांनी साकार केली आहे. मुळातच कवी मनाचे मनोहर या दोन व्यक्तिमत्वात इतके गुंतून जातात की काही ठिकाणी वर्णनातून त्यांचे काव्यच प्रकट होते. अतिशय काव्यमय आणि उत्कट अशी कादंबरी म्हणून रमाईचा उल्लेख करावा लागेल. भव्य, दिव्य असा वर्णनामध्ये

न रमता साध्या सरळ आणि काव्यमय भाषेत बाबासाहेब आणि रमाबाई यांच्या भावजीवनाचा आलेख ते उलगडत जातात. वाचकाला त्यांच्या जागी खेळवून ठेवण्याचे सामर्थ्य त्यांच्या लेखनात आहे. वर्णनात आलेला भाषेचा फुलोरा किती सहजतेने येतो हे त्यांच्या काही वर्णनातून आपल्याला जाणवते. प्रत्येक प्रकरणाला वेगळे शिर्षक देऊन कादंबरीच्या सलगपणात जरी खंड पडत असला तरी रमाई एक चांगली कादंबरी म्हणून आपल्या समोर येते. विशेषत: मनोहरांच्या शब्दकलेने ती मनावर ठसते. " करूणेच्या कवितेची अखेर " या प्रकरणात त्यानी केलेले वर्णन

" मरणासंबंधी रमाई बोलू लागली की बाबासाहेब तिच्या तोंडावर हात ठेवीत. हळवे होत. सदगदून जात. रामुला आपल्या संसारात दु:खच फार मिळालं याची कल्पना बाबासाहेबाना होती. तरी तिच्यामुळेच तर मी ज्ञानाच्या अंतराळात भरा-या मारु शकलो. तिच्या भरोशावर संसार सोडून आपण निश्चितपणे ज्ञानाच्या सागराच्या तळाशी जाऊ शकलो.

बाबासाहेब म्हणत,

रामूचं माझ्यावर फार मोठ कर्ज आहे. मी काहीही केलं तरी ते फिटणार नाही. म्हणूनच ते म्हणत.

रमा जिथून जगायला प्रारंभ करायचा तिथून तू मरणाची भाषा बोलते आहेस.

जिथून प्रकाशायचं तिथून तू विझण्याची भाषा करते आहेस. तुझा माझा दिवस आता कुठे उगवला आहे रमा आता तर रंगभूमीचा पडदा उघडला आहे आणि तू!

तू पडद्याआड जाण्याची भाषा करते आहेस!

तू जाऊ नको रमा! तू गेलीस की माझं घरच मोडून जाईल.

रमाईला हे पटत होतं पण तिला बाबासाहेबांचा सूर्य वर चढताना दिसत होता. तिला गौरव वाटत होता पण तिचा चंद्र निस्तेज होता. अदृश्य होण्याच्या मार्गावर होता चंद्राची भूमिका संपली होती. सूर्याच्या गैरहजेरीत घरात उजेड होण्याची तिची भूमिका ही भूमिका तशी संपत नव्हती पण खुद्द चंद्रानेच तसं ठरवून टाकलं होतं. [३४]

अशाच प्रकारचे आणखी एक वर्णन " कुंकू लाविलं रमान " या शीर्षकातील लग्नानंतरचे.

" काय घडणार आहे कोणालाच माहित नव्हतं. एवढं खरं की रमा एका वादळात सापडली होती. तिच्या पदराची गाठ एका तुफानाशी बांधली गेली होती. वादळ नेईल तिकडे जावं लागणार होतं. रमा आता वादळाची सावली झाली होती सूर्याची ती सावली झाली होती. पण योग असा होता की हे वादळालाही माहित नव्हतं. सावलीलाही माहित नव्हतं. सूर्यालाही ते अज्ञात होते. त्याच्यासाठी झालेल्या सावलीलाही ते अज्ञात होतं. सगळेच निर्णय भविष्याच्या काळोखाने दडवून ठेवले होते ".[३५] अशा कलात्मक वर्णनानी ही कादंबरी आकर्षक व वाचनीय बनली आहे.

या सर्व आठवणीतून व प्रसंगातून बाबासाहेबांच्या जीवनात उत्तरोत्तर कसा बदल होत गेला याचे दर्शन घडते. सुरुवातीला ते सश्रध्द भाविक असतात आणि नंतर अभ्यासाने एका समर्थ बुध्दीवादाची झेप त्यांच्या व्यक्तिमत्वात आढळते. म्हणूनच पंढरपूरला जाण्यासाठी रमाबाईने धरलेला आग्रह आणि त्यासंबंधीचा बाबासाहेबांचा वैचारिक युक्तीवाद हा त्यांच्या एकूणच व्यक्तिमत्वावर प्रकाश टाकणारा आहे. युगप्रवर्तक व रमाई या दोन्ही कादंब-यातून कादंबरीकारानी बाबासाहेबांच्या व्यक्तिमत्वाचा आलेख अतिशय समर्थपणे आणलेला आहे. युगप्रवर्तक मध्ये तो अधिक विस्ताराने गोष्टी वेल्हाळ स्वरूपात येतो. तर रमाई मध्ये

तो अधिक भावोत्कटपणे येतो. रमाबाई आणि बाबासाहेब यांच्या वादळी जीवनविश्वाची दखल दोन्ही कादंबरीकारानी अतिशय सजगतेने घेतली आहे. बालपण, विवाह, शिक्षण, देशसेवा समाज सेवा हे कार्य चित्रीत केले आहे हे चित्रित करत असताना त्यांच्यातील सामान्य माणसाचे विचार, विकार भावभावना या सामान्य रुपातच येतात आणि बाबासाहेबांचे जीवन म्हणजे एक महाकाव्याचा विषय अतिव प्रेमाच्या पोटी कादंबरीत उदात्तीकरणाचा धोका असतो हा धोका दोन्हीही कादंबरीकारानी टाळून बाबासाहेब व रमाबाई याना न्याय देण्याचा प्रयत्न या कादंब-यातून केलेला आहे.

मराठी कादंबरीच्या समीक्षामध्ये या कादंब-यांची फारशी दखल जरी घेतली नसली तरी या दोन्ही कादंब-या आशय आणि अभिव्यक्ती यांच्या अनुषंगाने श्रेष्ठ अशा स्वरुपाच्या आहेत.

## संदर्भ टीपा


| | | |
|---|---|---|
| १. | मनोहर, यशवंत | रमाई, पृष्ठ. ११ आवृत्ती १ ली. |
| २. | किता | पृष्ठ १४, १५ |
| ३. | किता | पृष्ठ २० |
| ४. | पगारे, हरिभाऊ | युगप्रवर्तक पृष्ठ २४, २५ आ. १ ली |
| ५. | किता | पृष्ठ २६ |
| ६. | मनोहर, यशवंत | रमाई, पृष्ठ ३२ आ. १ ली |
| ७. | पगारे, हरिभाऊ | युगप्रवर्तक, पृ. ४० आ. १ ली. |
| ८. | किता | पृ. ४२ |
| ९. | किता | पृ. ४२ |
| १०. | किता | पृ. ४४ |
| ११. | मनोहर, यशवंत | रमाई, पृष्ठ ४४, ४५ आ. १ ली. |
| १२. | किता | पृष्ठ ४९ |
| १३. | किता | पृष्ठ ५०. |
| १४. | किता | पृष्ठ ५० |
| १५. | किता | पृष्ठ ५४ |
| १६. | पगारे, हरिभाऊ | युगप्रवर्तक पृष्ठ ५२ आ. १ ली |
| १७. | किता | पृष्ठ ५२ |
| १८. | किता | पृष्ठ ५५ |

१९. मनोहर, यशवंत — रमाई, पृष्ठ ५९ आ. १ ली.

२०. कित्ता — पृष्ठ ७०, ७१

२१. पगारे, हरिभाऊ — युगप्रवर्तक पृष्ठ ६० आ. १ ली.

२२. कित्ता — पृष्ठ ६०

२३. मनोहर, यशवंत — रमाई पृष्ठ ६६ आ. १ ली

२४. पगारे, हरिभाऊ — युगप्रवर्तक पृष्ठ ७० आ. १ ली

२५. मनोहर, यशवंत — रमाई, पृ. ८६ आ. १ ली

२६. पगारे, हरिभाऊ — युगप्रवतक पृ. १४२ आ. १ ली

२७. मनोहर, यशवंत — रमाइ, पृष्ठ ८९ आ. १ ली

२८. कित्ता — पृष्ठ ९०

२९. कित्ता — पृष्ठ ९२

३०. कित्ता — पृष्ठ ९३

३१. कित्ता — पृष्ठ ९५

३२. मेश्राम, केशव — युगप्रवर्तक प्रस्तावना पृष्ठ १४

३३. पगारे, हरिभाऊ — युगप्रवर्तक पृष्ठ ३०९

३४. मनोहर, यशवंत — रमाई, पृष्ठ ८९, ९०

३५. कित्ता — पृष्ठ ३५